cmyk

## संपादकीय

### होरपळणारी नाट्यगृहे वाचविण्याची गरज

कोल्हापूरचा अभिमान असलेले ऐतिहासीक संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. गेल्या चार दिवसांपासून या घटनेने महाराष्ट्राचे कलाक्षेत्र हळहळत आहे. लोकभावना विचारात घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऐतिहासिक खासबाग मैदानाचे जळलेले अवशेष आणि खाक झालेल्या नाट्यगृहाला पूर्ववैभव प्राप्त करून देण्यासाठी राज्यसरकारचे २० कोटी आणि विमा रकमेतून पाच कोटी खर्च करण्याचा शब्द दिला.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### युजीसी-नेट परीक्षा रद्दच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका फेटाळली

नवी दिल्लीः विद्यापीठ अनुदान आयोगाची राष्ट्रीय पात्रता परीक्षा (युजीसी-नेट) रद्द करण्याच्या निर्णयाला आव्हान देणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि. १२) फेटाळून लावली. भारताचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळली. नेट-युजीसी परीक्षा १८ जून रोजी घेण्यात आली होती. आणि १९ जून रोजी परीक्षा रद्द करण्यात आली होती. आता ही परीक्षा २१ ऑगस्ट रोजी होणार आहे. याचिकेत परीक्षा रद्द करण्याच्या निर्णयाला आव्हाने देण्यात आले होते. आता २ महिने उलटले आहेत.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-११३ | मंगळवार दि.१३ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# मराठवाड्यातील सोयाबीन उत्पादक संकटात

## पिवळा मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव, उत्पादनात घट होण्याची शक्यता

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात खरीपात मराठवाड्यात सर्वाधिक पेरल्या जाणाऱ्या सोयाबीनवर आता पुन्हा एकदा पिवळ्या मोझॅकसह विषाणूजन्य हिरवा मोझॅकचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्याने सोयाबीन उत्पन्नात जवळपास ७५ टक्क्यांची घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.**

मागील वर्षी मराठवाड्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे पावसाच्या लहरीपणामुळे मोठें नुकसान झाले होते. सरासरीपेक्षा कमी पाऊस आणि नंतर अतिवृष्टीमुळे सोयाबीनवर पिवळा मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने सोयाबीन पिकाने माना टाकल्याचे दिसून आले होते. यातूनही काही शेतकऱ्यांचे पीक वाचले मात्र त्यांना शेवटपर्यंत योग्य भाव मिळाला नाही. एकंदर या परिस्थीमुळे मराठवाड्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांवर संकट आले आणि अनेक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघाला नाही. याबाबत शासनाकडे मदतीसाठी आवाज उठविला होता, मात्र शासनाकडूनही ना योग्य मदत मिळाली ना कोणता हमी भाव देण्यात आला. यंदा पावसाने चांगली सुरूवात केली आहे. किमान पिकांसाठी तरी चांगला पाऊस मराठवाड्यात झाला आहे. यामुळे मोठ्या उत्साहात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सोयाबीनची लागवड केली आहे. यंदा तरी पीक हाती पडेल आणि चांगले उत्पन्न मिळेल अशी शेतकऱ्यांना आशा आहे. पण आता ◀◀ पान २ वर



### परभणीच्या कृषी विद्यापीठाने सुचवले उपाय

मोझॅक(केवडा) झालेली प्रादुर्भावग्रस्त पाने, झाडे दिसून येताच ती वेळोवेळी तात्काळ समूळ काढून बांधावर न फेकता जाळून अथवा जमिनीत पुरून नष्ट करावीत जेणेकरून निरोगी झाडांवर होणारा किडीचा व रोगांचा प्रसार कमी करणे शक्य होईल. मावा व पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी पिकावर रोगाची लक्षणे दिसताच किंवा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून थायमिथोक्झाम १२.६% + लॅम्बडा सिहॅलोथ्रीन ९.६% झेडसी ५० मिली (२.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात साध्या पंपाने) किंवा असिटामिप्रीड २५%+बाइफेन्थ्रीन २५ % डब्ल्यूजी १०० ग्रॅम (५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात साध्या पंपाने) किंवा बीटा साइफ्लुथ्रीन ८.४९%+इमिडाक्लोप्रीड १९.८१% ओडी १४० मिली (७ मिली प्रती १० लिटर पाण्यात साध्या पंपाने) यापैकी एका किटकनाशकाची फवारणी प्रति एकर याप्रमाणात करावी. पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी पिकामध्ये प्रति एकरी १० पिवळे चिकट सापळे लावावेत. फवारणीसाठी कीटकनाशकाची व पाण्याची शिफारस केलेली मात्राच वापरावी. नत्रयुक्त खताचा अतिरिक्त वापर टाळून शिफारसीनुसारच करावा. कमीत कमी पहिले ४५ दिवस पीक तणमुक्त ठेवावे. पावसाचा ताण पडल्यास पिकास संरक्षित पाणी द्यावे. आवश्यकता वाटल्यास दहा दिवसानंतर परत एकदा कीटकनाशकांची फवारणी करावी.

## हिंडेनबर्ग प्रकरणाची संयुक्त संसदीय समिती मार्फत चौकशी करा !

### अन्यथा काँग्रेसचा देशभर आंदोलन करण्याचा इशारा



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**सेबीच्या अध्यक्षा माधबी बुच यांच्यावरील हिंडेनबर्ग संशोधनाच्या आरोपांवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारवर हल्ला चढवत काँग्रेसने सोमवारी या प्रकरणाची जॉईट पार्लमेंटरी समिती अर्थात जेपीसी (संयुक्त संसदीय समिती) मार्फत चौकशीची मागणी केली. मागणी मान्य न केल्यास देशव्यापी आंदोलन छेडण्याची धमकी काँग्रेसन दिली.**

काँग्रेस सरचिटणीस (संघटना), के सी वेणुगोपाल यांनी आरोपांचे वर्णन ''अत्यंत गंभीर'' असे केले आणि पंतप्रधानांनी या प्रकरणात अदानींना पाठिंबा दिल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, पंतप्रधानांनी या प्रकरणावर मौन बाळगणे म्हणजे विश्वासार्हता नष्ट करणे होय. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीचा वापर करून केंद्र सरकार लोकांचे लक्ष या प्रकरणावरून हटवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. राहुल गांधींना ईडीची नोटीस देऊन धमकावण्याचा प्रयत्न करू नका. आम्ही अशा मुद्यावरून लक्ष विचलित करण्याच्या डावपेचांना कडाडून विरोध करू,'' असा इशारा देण्यात आला आहे. के सी वेणुगोपाल म्हणाले की, हा देशातील सर्वात गंभीर मुद्दा आहे. जर याची जेपीसी चौकशीची मागणी मान्य झाली नाही तर देशभरात तीव्र आंदोलन करणार ◀◀ पान २ वर

## मंदिरात चेंगराचेंगरी, ७ भाविकांचा मृत्यू

जहानाबादः बिहारच्या जहानाबादमध्ये भोलेनाथाला जलाभिषेक करताना धक्काबुक्की झाली. या धक्काबुक्कीनंतर मोठ्या प्रमाणात चेंगराचेंगरी झाली. यात ७ भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर १२ हून अधिक जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये पाच महिलांचा समावेश आहे. जखमी भाविकांमध्ये अनेकांची प्रकृती ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१२ ऑगस्ट २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :६२.०० क्विंटल | २,७५१ | ३,०९१ | २,९२१ |
| ज्वारी/हायब्रिड :७२.५० क्विंटल | २,१३१ | २,५०० | २,२४४ |
| मूग :१४.५० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ०.५० क्विंटल | ८,५०० | ८,५०० | ८,५०० |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: २६.०० क्विंटल | २,५०० | २,८१८ | २,६१६ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १३०.५० क्विंटल | ४,२२१ | ४,२७५ | ४,२४८ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,९०० | ६,६५० | ६,२७५ |

# स्व.विमलताईच्या नखाचीही तिन्ही मुंदडांना सर नाही!

## निष्ठावंत नाराज, नागरीक संभ्रमात, तरीही पंकजाताईंची मेहरबानी का?



**नागनाथ वारद । अंबाजोगाई**

**केज मतदारसंघात आ. नमिता मुंदडा यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा आणि अक्षय मुंदडा यांच्या हेकेखोर कारभारामुळे भाजपाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांत कमालीची नाराजी आहे. तर मतदार संघात कमी आणि बाहेर जास्त असल्याने नमिता मुंदडा या आमदार आहेत, की नाही? हाच प्रश्न आता जनतेला पडला आहे. रस्त्याच्या कामात लक्ष्मीदर्शन करण्यातच हे तिन्ही मुंदडा सध्या व्यस्त असल्याने कार्यकर्त्यांसह नागरीकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. स्व. विमलताई मुंदडा यांनी या मतदार संघात आपल्या कार्याची छाप सोडली होती. मात्र निष्क्रीयतेमुळे तिन्ही मुंदडांना विमलताईच्या नखाची सुध्दा सर येत नसल्याचे बोलले जात आहे. जनतेला संभ्रमात ठेवणाऱ्या मुंदडा परिवारावर भाजपाच्या वरिष्ठ नेत्या आ. पंकजाताई मुंडे मेहरबान का? असा सवाल जनतेतून होत आहे.**

संयमी व नम्र स्वभावामुळे गेली अनेक वर्ष स्व.आ. विमलताई मुंदडा यांनी केज मतदारसंघावर अधिराज्य गाजवले. तत्कालीन काळात स्व. विमलताई मुंदडा यांनी महाराष्ट्र राज्याचे आरोग्यमंत्री पद सांभाळून संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या कार्याची ओळख दाखवत राजकीय क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला होता. स्व.मुंदडा काळात केज मतदारसंघात अनेक विकासाभिमूक कामे झाली.त्यांच्या निधनानंतर केज मतदारसंघात एक पोकळी निर्माण झालेली असतानाच भाजपकडून स्व.मुंदडा यांच्या सूनबाई नमिता मुंदडा यांना उमेदवारी मिळाली त्या निवडूनही आल्या.मतदारांनी केवळ स्व.विमलताई मुंदडा यांच्या त्या सूनबाई आहेत म्हणून विकासाची अपेक्षा ठेवून मतदान केले.परंतू मतदारांची घोर निराशा झाली.आ.नमिता मुंदडा यांचे सासरे नंदकिशोर ◀◀ पान २ वर

### रोजगार हमीची कामे अडवली

या प्रकरणात संबंधित गटविकास अधिकारी यांना एवढा त्रास झाला की त्यांना महिनाभर रजा घ्यावी लागली. ग्रामीण भागातील नाली व रस्ते असो छोटछोट्या कामातही हस्तक्षेप करून कामे अडवली.मीच सर्व कामे करणार असा दबाव आणून केज नगर पंचायतची कामे बांधकाम विभागाकडे वर्ग केली. अद्याप ७५ कोटीची कामे पूर्ण झाली नाहीत. स्व.गोपीनाथ मुंडे नाट्यगृह असो वा इतर अनेक कामे प्रलंबित का ठेवली आहेत? अशा अनेक तक्रारी असताना ही आ.पंकजाताई मुंडे या मुंदडा यांना का पाठिशी घालत आहेत, असा सवाल ही लोकांतून विचारला जात आहे.

### उमेदवार बदलला तरच कार्यकर्ते प्रचार करणार?

आगामी विधानसभा निवडणूकीत केज मतदारसंघात नमिता मुंदडा यांना उमेदवारी देण्यात येवू नये असा सूर भाजपच्या निष्ठावान कार्यकर्ते तसेच भाजप चे पारंपरिक मतदारांतून निघत आहे. आ.पंकजाताई मुंडे यांनी लोकभावना लक्षात घेऊन पुढील पावले उचलावीत. केज मतदारसंघातील प्रत्येक गावात सर्वे करून सद्यस्थिती कशी आहे ? याची चाचपणी करूनच नमिता मुंदडा यांना उमेदवारीबाबत विचार करावा अशीही मागणी जनतेतून होत आहे.लोकसभेत झालेल्या पराभवाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी भाजपाने नव्या चेहऱ्यास संधी द्यावी तरच भाजपचा गड कायम राहील अशी चर्चा होत आहे.

# वाहतुक शाखेच्या सतर्कतेने गुन्हा टळला

- संशयितरित्या थांबलेल्या तिघांसह स्कॉर्पिओ जप्त
- वाहतुक शाखेची कारवाई; वाळूचा हायवाही पकडला



**बीड । प्रतिनिधी**

**पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ आणि अप्पर पोलिस अर्क्षिक सचिन पांडकर यांच्या सुचनेनुसार वाहतुक शाखेने रात्रीची गस्त घालताना राक्षसभुवन-म्हाळस पिंपलगाव रस्त्यावर तिघेजण संशयितरित्या थांबल्याने व गुन्ह करण्याच्या उद्देशाने थांबले होते. त्यांना स्कॉर्पिओसह ताब्यात घेऊन गेवराई पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच बीडकडे परतताना जप्ती पारगाव जवळ वाळूची चोरटी वाहतूक करणारा हायवा ताब्यात घेऊन चालकाविरोधात बीड ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई बीड जिल्हा वाहतुक शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुभाष सानप यांनी सोमवारी पहाटे केली.**

पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी पदभार घेताच बीड जिल्ह्यातील अवैध धंदे, गैरप्रकार रोखण्याच्या सक्त सुचना सर्व अधिकाऱ्यांना दिल्या. यानुसार पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतुक शाखेचे सपोनि सुभाष सानप व त्यांचे सहकारी यांनी अवैध वाहतुकीवर कारवाई व गस्त घालण्यासाठी गेवराई तालुक्यात गेले होते. यावेळी राक्षसभुवन ◀◀ पान २ वर

# आ. क्षीरसागर, सय्यद सलीम यांच्या पाठपुराव्यातून बीडकरांचे प्रश्न मार्गी लागणार

## जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक; रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा, स्वछता कामगार यासंबंधी चर्चा



**बीड । प्रतिनिधी**

**शहराच्या विविध महत्वाच्या विषयांवर आ. संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांच्या पुढाकाराने जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि.१२) रोजी बैठक पार पडली. या बैठकीत बीड शहराच्या अनुषंगाने अनेक विषय मार्गी लागणार आहेत. या बैठकीत बीड शहराच्या दृष्टीने महत्वाचे असलेल्या अनेक विषयांवर चर्चा झाली तसेच पुढील कार्यवाहीचे नियोजन करण्यात आले.**

बीड शहराचे असलेले अनेक महत्वाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी बीड जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक घेतली या बैठकीत विविध विषयांवरील आढाव घेतला तसेच काही प्रलंबित प्रश्नांवर कार्यवाहीची पुढील ◀◀ पान २ वर

### आ. क्षीरसागर यांनी मांडलेले महत्वाचे मुद्दे

शहरातील कचरा व्यवस्थापन तसेच स्मशानभूमी दुरुस्ती, भाजी मंडई स्वच्छता, छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण देखभाल दुरुस्ती, बीड शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्याची व आवाराची स्वच्छता व देखभाल दुरुस्ती तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या उंची वाढवणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्या शेतकऱ्यांची खरवंडी ते बीड राष्ट्रीय महामार्गमध्ये गेलेल्या जमीनीचा त्यांच्या भुसंपादनाचा मावेजा अद्याप मिळालेला नाही तो त्यांना तातडीने मिळावा याबाबत तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी या बैठकीत केली.

# केंद्राने आरक्षणाची पन्नास टक्क्याची मर्यादा वाढविल्यास आमचा पाठिंबा

## मराठा आरक्षणप्रश्नी शरद पवार यांचे मोठे वक्तव्य, तिढा सोडविण्यासाठी जरांगे, ओबीसी नेत्यांसह सर्वपक्षीय बैठक बोलवा

**पुणे । प्रतिनिधी**

**आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे. केंद्राने हे धोरण बदलले पाहिजे. केंद्र सरकारने त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. केंद्र सरकारने धोरण बदलण्याची भूमिका घेतली तर आम्ही त्यांना पाठिंबा देऊ अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना मांडली.**



शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी सर्व पक्षीय बैठक बोलवावी. या बैठकीला विरोधी पक्षाच्यावतीने आम्ही हजर राहू. सर्वपक्षीय बैठकीला मनोज जरांगे यांनाही निमंत्रित करावे. याशिवाय, ओबीसींचे नेतृत्व करणारे छगन भुजबळ यांनाही निमंत्रित करावे. त्या संयुक्त बैठकीत चर्चा करून आरक्षणाचा तिढा कसा सोडविता येईल ते पाहावे, असेही यावेळी त्यांनी सांगितले. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, माझ्या मते आज महाराष्ट्राचे सामाजिक वातावरण व्यवस्थित ठेवण्याची काळजी सगळ्यांनी घेतली पाहिजे. दोन समाजामध्ये कटुता निर्माण होणार नाही, यादृष्टीने पावले टाकली पाहिजेत. वेळीच काळजी घेतली नाही तर काय होईल, हे सांगता येणार नाही. मी पर्याय सुचवला, माझी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी ◀◀ पान २ वर

### केंद्र सरकारकडे सर्वमिळून आग्रह धरू

आरक्षणाच्या प्रश्नावर आपली भूमिका स्पष्ट करताना शरद पवार म्हणाले की, यामध्ये एकच अडचण येण्याची शक्यता आहे की, आज ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देता येत नाही, असा निर्णय न्यायव्यवस्थेने घेतला आहे. या निर्णयाची अडचण आली तर महाराष्ट्रातील सगळ्यांनी मिळून केंद्र सरकारकडे आग्रहाची भूमिका मांडावी. तामिळनाडूमध्ये यापूर्वी ७६ टक्क्यांपर्यंत आरक्षण दिले होते, तो निर्णय न्यायालयात टिकला होता. यानंतर ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देऊ नये, असेच निकाल देण्यात आले होते. त्यासाठी हे धोरण बदलायचे असेल आणि ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण द्यायचे असेल तर तो अधिकार केंद्र सरकारकडे आहे. याबाबत कुठल्याही प्रकारचे राजकीय मतभेद न करता केंद्र सरकारने पुढाकार घेतल्यास आमचे पूर्ण सहकार्य असेल. या पद्धतीने आपण प्रयत्न करुन मार्ग काढू, असा आशावादही यावेळी त्यांनी व्यक्त केला.

cmyk

## अग्रलेख

# होरपळणारी नाट्यगृहे वाचविण्याची गरज

कोल्हापूरचा अभिमान असलेले ऐतिहासीक संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. गेल्या चार दिवसांपासून या घटनेने महाराष्ट्राचे कलाक्षेत्र हळहळत आहे. लोकभावना विचारात घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऐतिहासिक खासबाग मैदानाचे जळलेले अवशेष आणि खाक झालेल्या नाट्यगृहाला पूर्ववैभव प्राप्त करून देण्यासाठी राज्यसरकारचे २० कोटी आणि विमा रकमेतून पाच कोटी खर्च करण्याचा शब्द दिला.

लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या जिद्दीतून हे भव्यदिव्य नाट्यगृह साकारले. इथली वैशिष्ट्यापूर्ण वास्तूरचना अगदी शेवटच्या आणि कोपऱ्यातल्या प्रेक्षकासही रंगमंचावर चाललेला प्रयोग सहज पाहता येईल आणि शब्द न् शब्द संवादातील चढउतारांसह ऐकू येईल इतकी चांगली होती. सागवानी लाकडाने या वास्तूला एक वैशिष्ट्या प्राप्त करून दिले जे गेली १०९ वर्षे दिमाख राखून होते.

जगात अशी अनेक वस्तूंची उदाहरणे आहेत जी नैसर्गिक आपत्ती आणि आगीच्या भक्ष्यस्थानी पडली किंवा त्यांच्या बाबतीत दुर्लक्ष किंवा घातपाताचा उद्देश ठेवून काही नुकसान करण्यात आले. त्यादृष्टीने याच्या तपासाचे काम स्वतंत्रपणे सुरू राहील. पण, हे नाट्यगृह जसेच्या तसे पुन्हा उभे राहणे आणि त्यात त्याची तीच वैशिष्ट्ये रसिकांना अनुभवायला येणे आवश्यक आहे. शिवाय यातून बोध घेऊन इतर नाट्यागृहे आणि संरक्षित वास्तूंच्या जतनाचा विचार सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी, विश्वस्त संस्थांचे पदाधिकारी करतील अशी अपेक्षा आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा रविवारचा दौरा त्यादृष्टीने खूप मोलाचा होता. त्यांनी हळहळत न बसता हे वास्तव स्वीकारून नाट्यागृहाची जुनी वास्तू आधुनिक पद्धतीने वर उचलून घेता येईल का? पडझड झालेल्या ठिकाणचे बांधकाम जसे होते तसे करून त्याला आधूनिकदृष्ट्या अधिक भक्कम करता येईल का? त्यासाठी हेरिटेज वास्तू जतन करून बांधकाम करणारे लोक कुठे आहेत, कोण आहेत, त्यांनी अशी कामे कुठे कुठे केली आहेत याची माहिती दिली. त्यांची या कामासाठी मदत घेण्याचे आणि या कामात तकलादू वस्तू न वापरता पुढची दीडशे दोनशे वर्षे ही वास्तू जपता येईल असे काम करण्याचे अधिकाऱ्यांना आदेश दिले. आपल्या अनुभवाचा लाभ या नाट्यगृहाच्या उभारणीत देण्यामागे त्यांची तळमळ आणि खासबाग मैदानातील इमारत उभी करण्यासाठी जुन्या छायाचित्रांचा, माहितीचा अभ्यास करण्याबाबत दिलेले आदेश महत्त्वाचेच. संगीतसूर्य केशवराव भोसले आणि राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतींना कोल्हापूरने आगीच्या तडाख्यानंतरही जपायचा निर्धार खूप महत्त्वाचा आहे. दुसऱ्या महायुद्धात जळलेले पॅरिस तिथल्या जनतेने आणि राज्यकर्त्यांनी जिद्दीने पुन्हा उभे केले. मुळात पॅरिसचे नुकसान होऊ नये म्हणून ते विरोध न करता नाझींच्या ताब्यात देऊनही नुकसान टळले नाही. पण, लोकांनी पुन्हा उभारणी केल्याच्या इतिहासाची जगाने ऑलिम्पिक स्पर्धेच्या निमित्ताने उजळणी केली. तीच कृती कोल्हापुरात घडण्यासाठी राज्यकर्त्यांचा शब्द विरुन न जाता प्रत्यक्षात आणण्यासाठी जनतेने जागृत राहिले पाहिजे.

अशा घटना का घडत आहेत याचा विचार राज्यातील कला रसिकांनीसुध्दा करण्याची आवश्यकता आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, सांगली, इचलकरंजी अशी काही नाट्यगृहे वगळता इतरत्र महिन्याला जेमतेम चार, पाच कार्यक्रम सुद्धा होत नाहीत. नाट्यगृहात तमाशा वा इतर कलाप्रकार खपत नाहीत. मुंबई, पुण्यात ज्यांच्या पहिल्या दहा रांगाही भरत नाहीत असे कलाकार, नाटककार ग्रामीण महाराष्ट्रात प्रयोग करायला अव्वाच्या सव्वा खर्च मागतात. ग्रामीण चौकोनी कुटुंबाला एक नाटक दोन हजाराला पडते. तो परवडत नसल्याने खरा रसिक येत नाही, परिणामी दाद नाही. त्यात अनेक नाट्यगृहांना वातानुकूलित यंत्रणा नाही. जिथे आहे तिथे नाटक करायला कलाकार खूश असतात. घामाघूम कलाकाराने थकून जीव धोक्यात का घालावा? अनेक पालिकांच्या नाट्यगृहात आधुनिक ध्वनी, प्रकाश योजना आहेत. मात्र त्या चालविता येणारा स्टाफ नाही. केशवराव भोसले सारख्या सर्वच नाट्यगृहात तंत्रज्ञ, वायरमन आणि इतर स्टाफ हा नाटक किंवा कार्यक्रमा दिवशी तेवढाच येतो. परिणामी दैनंदिन देखरेख नाही, अनेकांना जनरेटर सुरूच नाही हे वीज गेल्यानंतर समजते. केशवराव भोसले नाट्यगृह जळाले पण अशाच असंख्य महापुरुषांच्या आणि थोर कलाकारांच्या नावाने सुरू असलेली, बंद पडलेली आणि बांधकामाविना वर्षानुवर्षे पडून असलेली नाट्यगृहेही होरपळत आहेत. मुंबईत जे स्थानिक ते बाहेर सेलिब्रिटी ठरतात. तर आपापल्या विभागात स्थानिक कलाकारांना प्रयोग करायला लावून प्रोत्साहन दिले, त्याचवेळी प्रेक्षकही घडवले तर चांगल्या आणि व्यावसायिक कलाकृती ग्रामीण महाराष्ट्रातही उभ्या राहू शकतात. नाट्यगृहे जोमाने चालून मुंबई, ठाणे प्रमाणे वर्दळीची ठरतील. अनास्था, दुरावस्था आणि दुर्लक्ष जरी कमी झाले तरी किमान होरपळ बंद होईल. याचा विचार उर्वरित आणि बृहन्महाराष्ट्राने केला तरच या स्थितीतून मार्ग निघेल.

# जीवनात यशस्वी होण्यासाठी भगवंताला शरण जा- श्री.१०८ प.पू.ष.ब्र.शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर



## श्री.गुरु माउलीचे ४० वे श्रावणमास तपोअनुष्ठान व रुद्र पूजा व गुरुमाऊलींचे अमृत उपदेश

**बीड। प्रतिनिधी**

**येथून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे श्रावण मासानिमित्त गुरूवर्य प.पु.ष.ब्र.१०८ तपोरत्न श्री. शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी तमलूरकर यांचे अनुष्ठान चालू आहे. या अनुष्ठानात शिवपाठ , सामुहिक ईष्टलिंगपुजा, गाता भजन गुरूवर्यांचे अमृत उपदेश व श्रोते यांना शिवमहिमा महाराज सांगत आहेत.**

भगवान शिवशंकर हे भक्तवत्सल आहेत ज्या ज्या ठिकाणी शिवाचा पूजा पाठ, पठण, सेवा व शिव आराधना असते त्या त्या ठिकाणी भगवान शिवाचा वास आहे असे महत्त्वपूर्ण उद्धार महाराजांनी भक्त मंडळींना सांगितले. कपिलधार येथे जमलेल्या सर्व भक्तगणांना शिवचार्य महाराजांनी शिवमहिमा सांगताना रामायणातील एक उदाहरण सांगितले म्हणजे प्रभुरामचंद्र आणि सर्व वानरसेना लंकेवर विजय करण्यासाठी समुद्र तीरावर गेली होती. समुद्र तीरावर प्रत्यक्ष भगवान प्रभू रामचंद्र आणि शिवलिंग स्थापून त्यांची आराधना केली आणि आपले कार्य पूर्ण व्हावे यासाठी शिवाला साकडे घातल आणि पुढे लंका विजय प्राप्त केला. याबरोबरच महाराजांनी साधू संतांचे अनेक दाखले दिले. या धर्तीवर संताचा महिमा आगात आहे संतांमध्ये दया ,करुणा ,प्रेम, शांती व सहनशीलता ही ओतप्रोत भरलेली असते. महाराज म्हणाले आपल्या जीवनामध्ये आपण या संतांना शरण गेलं की आपलं इच्छित कार्य पूर्ण होते यामध्ये शंकाच नाही.या तपोअनुष्ठान कार्क्रमाला आंध्रप्रदेश,कर्नाटक , तेलंगणा,बीड ,कपिलधारवाडी,आदी विविध राज्यातून तसेच पंचक्रोशीतील असंख्य भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दहावी-बारावी परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर

## बारावीची ११ फेब्रुवारीला तर दहावीची २१ फेब्रुवारीला होणार परीक्षा

**पुणे । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक १२ ऑगस्टला जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ या कालावधीत बारावीची परीक्षा पार पडेल तर दहावीच्या परीक्षेसाठी २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ हा कालावधी निश्चित करण्यात आला असल्याची माहिती राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी दिली आहे.**

राज्य शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या नऊ विभागीय शिक्षण मंडळांतर्गत दहावी-बारावीची अंतिम परीक्षा घेण्यात येते. विद्यार्थ्यांना अभ्यासाचे आगाऊ नियोजन करता यावे यासाठी गेल्या काही वर्षांपासून जुलै किंवा ऑगस्टमध्येच दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात येत आहे. त्यानुसार यंदा ऑगस्ट महिन्यात दहावी-बारावी परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. यासंदर्भात काही हरकती सूचना असल्यास २३ ऑगस्टपर्यंत राज्य मंडळाला पाठविणे गरजेचे आहे. त्यानंतर आलेल्या प्राप्त सूचनांवर कोणताही विचार केला जाणार नसल्याचे राज्य मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये अर्थसहाय्य मंजूर

**जालना । प्रतिनिधी**

गेल्या वर्षी पावसाळ्यात अत्यांत कमी प्रमाणात पाऊस पडला होता. त्त्याा ऐन पावसाळी हंगामात जिल्हाभरात पावसाचा भाग बदलत सरासरी २० ते ३० दिवसांचा खंड पडला होता. पाण्याअभावी सोयाबीन व कापूस यासह खरीप हंगामातील सर्वच पिके पाण्याअभावी सुकून गेली होती. यामुळे शेतकरी बांधवांना मोठ्या प्रमाणावर पिकांचे झालेले नुकसान सहन करावे लागले होते. या परिस्थितीत महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी मंठा परतूर घनसावंगी आणि जालना या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पिकांची पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना अर्थसहाय्य मिळवून देण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात बैठक घेऊन दुष्काळाने झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान मिळवून देण्याकरिता राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना त्यावेळी जिल्हाधिकारी जालना यांना दिल्या होत्या. आमदार बबनराव लोणीकर यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी जालना यांनी जालना जिल्ह्यातील मंठा परतूर अंबड जाफराबाद भोकरदन घनसावंगी जालना या सर्व तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान पीक क्षेत्राचे पंचनामे करून शेतकऱ्यांना शासकीय मदत होण्याच्या दृष्टीने अहवाल सादर केला होता. याबाबतीत आमदार बबनराव लोणीकर यांनीही नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी द्वारे सरकारची लक्ष वेधले होते. याबरोबर च आमदार लोणीकर यांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना भेटून जालना जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना अनुदान देण्याची मागणी केली होती. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ''खरीप हंगाम २०२३'' मध्ये सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना २ हेक्टरच्या मर्यादेत प्रती हेक्टरी ५००० रुपयांचे अर्थसहाय्य देण्याची घोषणा शासनाने केली आहे. ज्या शेतकऱ्यांनी खरीप २०२३ मध्ये ई-पीक पाहणी द्वारे आपल्या पिकाची नोंद केलेली आहे, त्या शेतकऱ्यांना सदरचे अनुदान मिळणार आहे. शेतकऱ्यांनी खरीप २०२३ मध्ये ऑनलाइन ई-पिक पाहणी केलेली आहे अशा सोयाबीन पिकामध्ये वैयक्तिक शेतकऱ्याची जालना जिल्ह्याची संख्या २,८२,१६२ असून सामायिक खातेदार शेतकऱ्यांची संख्या १७,३६८ आहे. तसेच कापूस या पिकामध्ये वैयक्तिक शेतकऱ्यांची संख्या २,१९,६८८ असून सामायिक खातेदार क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांची संख्या १५,३२४ आहे. प्रति शेतकरी दोन हेक्टर मर्यादा या अनुदाना करिता असल्याने दोन हेक्टर क्षेत्र असणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्यांच्या आधार लिंक खात्यावर खात्यावर दहा हजार रुपये अर्थसहाय्य जमा होण्यास सुरुवात झाल्याने जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये एक प्रकारे समाधानाचे वातावरण पसरले असून अनेक गावातील शेतकरी बांधव आमदार बबनराव लोणीकर यांचे आभार व्यक्त करताना दिसत आहेत.

# कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी वैद्यनाथ मंदिर परिसरात केले फराळ वाटप

## नाथ प्रतिष्ठाणतर्फे भाविकांना ५ क्विंटल साबुदाणा खिचडी, दीड टन सफरचंद तर ३० हजार पाणी पाउचचे वितरण

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

**राज्याचे कृषिमंत्री, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा नाथ प्रतिष्ठाण या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष धनंजय मुंडे यांनी आज द्वितीय श्रावण सोमवार निमित्त पाचवे ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिर परिसरात नाथ प्रतिष्ठाणच्या वतीने उभारण्यात आलेल्या फराळ वाटपाच्या स्टॉलला भेट दिली तसेच स्वतः साबुदाणा खिचडी व फळांचे भाविकांना वाटपही केले.**

नाथ प्रतिष्ठाण या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी श्रावण महिन्यामध्ये संपूर्ण वैद्यनाथ मंदिराची वेगवेगळ्या पद्धतीने सजावट करून तसेच प्रत्येक श्रावण सोमवारी भाविकांसाठी साबुदाणा खिचडी, विविध फळे तसेच मिनरल वॉटर चे वाटप धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून व ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली मागील अनेक वर्षांपासून केले जाते. आज श्रावण महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी तब्बल पाच क्विंटल साबुदाण्याची खिचडी तसेच सुमारे दीड टन सफरचंद व तीस हजार मिनरल वॉटर च्या पाऊचचे आज भाविकांना वाटप करण्यात आले, अशी माहिती नाथ प्रतिष्ठाणचे सचिव नितीन मामा कुलकर्णी यांनी दिली. याप्रसंगी ना.धनंजय मुंडे, नितीन मामा कुलकर्णी यांच्यासह रा.कॉ.चे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, जालिंदर नाईकवाडे, रामेश्वर महाराज कोकाटे, रवींद्र परदेशी, अमित केंद्रे, शंकर कापसे, गणेश सुरवसे, माऊली होळंबे, दीपक कुरील यांसह आदी उपस्थित होते.





## पान १वरून...

### मराठवाड्यातील सोयाबीन

पुन्हा हा रोग पिकावर पसरला तर यंदाही सोयाबीन धोक्यात येण्याची शक्यता आहे. या दोन्ही प्रकारच्या मोझॅकमुळे झाडाच्या अन्ननिर्मिती प्रक्रियेमध्ये बाधा होऊन प्रादुर्भावग्रस्त झाडांना फुले आणि शेंगा लागत नाहीत त्यामुळे वेळीच या रोगाला ओळखून तसेच मावा व पांढऱ्या माशीचे नियंत्रण करून या रोगाचे व्यवस्थापन करण्याची गरज आहे. शासनाने याची दखल घेत मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी पिकाच्या रोगाबाबत जागृती आणि त्यावरील उपाय सांगण्यासाठी कृषी विभागातील कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांशी संपर्क करण्याबाबत आदेशीत करावे, अशी मागणी होत आहे.

------------

### स्व.विमलताईच्या नखाचीही

मुंदडा यांनी स्वतः कडेच आमदारकीचे सुत्रे हाती घेवून हेकेखोर वृत्तीने तसेच पूर्व वैमनस्यातून कामे करायला सुरूवात केल्याने जनतेसह भाजपाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांत प्रचंड नाराजी पसरली आहे.ज्यांच आयुष्य भाजप पक्षात गेलं जे स्व.गोपीनाथ मुंडे यांच्यावर प्रेम करणारे आहेत अशा कार्यकर्त्यांना हिनपणाची वागणूक मिळत असल्याची ओरड होत आहे.

केज मतदारसंघात आ.नमिता मुंदडा यांच्याबाबत जनतेत नाराजी असताना भाजपाच्या वरिष्ठ नेत्या आ.पंकजाताई मुंडे या मेहरबान का? असा सवाल चर्चिला जात आहे. निष्ठावान कार्यकर्त्यांची अॅलर्जी असलेल्या मुंदडा परिवाराला भाजपा पक्षाचे काही देणेघेणे नाही. अहंकारी नंदकिशोर मुंदडा यांनी एकला चलोचा अवलंब करीत केवळ आपल्या मोजक्याच कार्यकर्त्यांसोबत घेवून सत्तेचा उपभोग घेत असल्याने केज मतदारसंघात भाजपला मानणाऱ्या मतदार व कार्यकर्त्यांत कमालीचा रोष पसरला आहे. या वृत्तीमुळेच नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पंकजाताई मुंडे यांना लोकांनी मते दिली नसल्याचेही बोलले जात आहे. लोकसभा निवडणुकीत पंकजाताईंना मोठा संघर्ष करावा लागला. नेहमी आघाडी देणारा मतदारसंघात २० हजाराची लीड कमी मिळाली. एकंदरीत ६५ ते ७० हजार मतदार हा भाजप पासून दूर गेला. पंकजाताई च्या पराभवास कारणीभूत असलेल्या मुंदडांवर लोक नाराज आहेत हे स्पष्ट दिसत असून देखील यावर गप्प न बसता मुंदडा यांनी ग्रामीण भागातील लोकांना मतदान केले नाही म्हणून कामे अडवण्यास सुरूवात केली. शेतकरयांना वेठीस धरून एम. एस. ई. बी.च्या वीज ट्रान्सफॉर्मर काम असो वा नाली रस्ते असो प्रत्येक कामात तोंड बघून कामे करण्याची पद्धत सूरू केली आहे.वीज वितरण कार्यालयातील अधिकाऱ्यांवर दबाव टाकून डीपीचं काम,नविन विद्युत कनेक्शन यामध्ये ढवळाढवळ करत शेतकरीवर्गाला त्रास देण्याचे कामे केली. सत्तेचा माज असलेल्या मुंदडांनी ''हम करे सो कायदा'' म्हणत लोकांना अपमानास्पद वागणूक दिल्याचीही चर्चा होत आहे. गेल्या साडेचार वर्षांत केज मतदारसंघात इतरांना कामे करू दिली नाहीत.

-----------

### हिंडेनबर्ग प्रकरणाची संयुक्त

असल्याचा इशाराही यावेळी दिला. सेबीच्या अध्यक्षा माधबी पुरी बुच आणि त्यांच्या पतीने बर्म्युडा आणि मॉरिशसमधील अस्पष्ट ऑफशोर फंडांमध्ये अघोषित गुंतवणूक केल्याचा आरोप हिंडेनबर्ग यांनी शनिवारी केला होता, त्याच संस्थांचा वापर अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी राउंड-ट्रिप फंडांसाठी करत स्टॉकच्या किमती फुगविण्यासाठी केला. हिंडेनबर्गने केलेल्या गौप्यस्फोटानंतर बुच आणि त्यांचे पती धवल बुच यांनी रविवारी एका संयुक्त निवेदनात सांगितले की, ही गुंतवणूक बुच यांची सेबीच्या पूर्णवेळ सदस्या म्हणून नियुक्ती करण्या आधी २०१५ मध्ये केली होती. माधबी बुच यांची २०१७ मध्ये पूर्णवेळ सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर मार्च २०२२ मध्ये माधबी बुच यांची नियुक्ती आणि अध्यक्ष म्हणून पदोन्नती ही ''सिंगापूरमध्ये राहणारे खासगी नागरिक'' म्हणून करण्यात आलेली आहे. त्यामुळे माधबी बुच यांनी गुंतवणूक केलेला फंड हा खासगी स्वरूपात राहिला. दरम्यान, काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले की, नॉन बायोलॉजिकल पंतप्रधान हे एक उत्तम बायोलॉजिकल व्यवसायी आहेत. मोदानी मेगास्कॅमची जेपीसी मार्फत चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली.

------------

### आ. क्षीरसागर, सय्यद सलीम यांच्या

नियोजनाची आखणी केली. जिल्हाधिकारी यांच्या दालनात सोमवारी जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम व उपविभागीय अधिकारी, बीड नगरपरिषद मुख्याधिकारी व सर्व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत बीड शहराच्या स्वच्छता पाणीपुरवठा व रस्ते व नगरपरिषदेच्या स्वच्छता कर्मचारी यांना लाड व पागे कमिटीच्या शिफारसीनुहशसार वारसा हक्काने नोकरीत सामावून घेणे बाबत सविस्तर चर्चा झाली. दरम्यान बीड शहरातील राजूरी वेस ते बलभीम चौक, बलभीम चौक ते धोंडीपुरा, धोंडीपुरा ते माळीवेस, माळीवेस ते कबाडगल्ली, कबाडगल्ली ते बुंदेलपुरा, बुंदेलपुरा ते राजूरीवेस, कारंजा पिंगळे गल्ली ते बुंदेलपुरा हे रस्ते अत्यंत खराब झाले आहेत. सदर रस्त्यांचे प्रस्ताव नगरविकास विभाग यांना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मंजूरीसाठी पाठविण्यात यावे, अशी मागणी या बैठकीत केली असता रस्त्यांच्या मंजुरीचा प्रस्ताव मंत्रालयाकडे पाठविण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकारी यांना सूचना दिल्या. शहरातील रस्त्यांचे काम लवकर सुरू होण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. तसेच स्वच्छता विभागात १५ वा वित्त आयोगाच्या पैशांसाठी जिल्हाधिकारी यांनी नगरविकास विभागाला पैशाची मागणी करून स्वच्छतेसाठी आर्थिक निधी उपलब्ध करून देण्याचे ठरले. बीड शहराची स्वच्छता युध्दपातळीवर करून घेण्याचे जिल्हाधिकारी बीड यांनी मुख्याधिकारी यांना सूचना दिल्या. बीड शहराला पाणीपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी जनहित याचिका क्रमांक २१ ऑफ २०२४ मध्ये उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे आदेश ११ जून २०२४ व ६ ऑगस्ट २०२४ च्या अनुषंगाने नगरपालिकेकडील वीजबिल थकबाकीसाठी सचिव नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे बैठक लावण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी नगरविकास विभागाला बैठक लावण्यासंदर्भात पत्रव्यवहार करणार आहेत. यासोबतच बीड नगरपरिषदेच्या २४० रोजंदारी कर्मचार्यांना सन.२००१ साली खास बाब म्हणून कायमस्वरूपी नियुक्त करण्यात आले होते. परंतु कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना लाड कमिटी व पागे कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काचा फायदा मिळत नव्हता. त्यामुळे राज्य शासनाच्या समाजकल्याण विभाग मंत्रालयाने दि.२४ फेब्रुवारी २०२३ रोजी सदर कर्मचाऱ्यांना वारसा हक्काचा फायदा मिळावा या हेतूने शासन निर्णय घेण्यात आला. परंतु बीड नगरपालिकेने सदरील शासन निर्णयानुसार, आत्तापर्यंत स्वच्छता कर्मचाऱ्यांना वारसा हक्काप्रमाणे नियुक्ती दिलेली नाही. त्यासाठी मुख्याधिकारी यांनी समाजकल्याण विभाग मंत्रालय यांच्याकडून तात्काळ मार्गदर्शन मागवून पुढील कार्यवाही सुरु करण्याचे या बैठकीत ठरले. या अशा अनेक प्रकारच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा होऊन विषयी मार्गी लावण्यासंबंधी सदरील बैठकीत पाऊले उचलली गेली. सोमवारी (दि.१२) रोजी झालेल्या बैठकीत बीड शहराच्या आणि मतदारसंघाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असलेले अनेक विषय मार्गी लागण्यासाठीचे नियोजन करण्यात आले. या बैठकीस आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्यासह उपजिल्हाधिकारी, बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

-----------

### मंदिरात चेंगराचेंगरी,

गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जहानाबादच्या मखदुमपुर येथील वाणावर बाबा सिद्धेश्वरनाथ मंदिरात ही दुर्दैवी घटना घडली. श्रावणी सोमवार असल्याने हे सर्व भाविक भोलेनाथाच्या जलाभिषेकासाठी रविवारी मध्यरात्री पासूनच मंदिरात जमले होते. यामुळे मंदिरात लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यावेळी अचानक रांग मोडल्याने धक्काबुक्की झाली. याचे रूपांतर चेंगराचेंगरीत झाले. यात ७ जणांचा मृत्यू झाला.

-----------

### वाहतुक शाखेच्या सतर्कतेने

ते म्हाळस पिंपळगाव रस्त्यावर सोमवारी पहाटे ४.१५ वा. काळा रंगाची स्कॉर्पिओ दिसून आली. त्यात दोघेजण होते, त्यांना चौकशी केली असता त्यांना समाधानकारक उत्तर देता आले नाही. ते दोघे काही तरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने तेथे थांबल्याचे लक्षात आल्याने त्यांना घेऊन गेवराई पोलिस ठाण्याकडे जात असताना काही अंतरावरच आणखी एक जण रस्त्यालगत थांबल्याचे दिसले. त्याच्याकडे चौकशी केली असता तो संशयित असल्याचे दिसून आल्याने त्यासही घेऊन गेवराई पोलिस ठाण्यात हजर केले. यावेळी भाऊसाहेब बाबासाहेब पोपटघाट (वय-२५, रा. लोहार गल्ली, गेवराई), महादेव आसाराम निकम (वय३८, रा. सावता नगर, गेवराई), फारुख यसिन शेख (वय-२७, मुदापुरी, ता. गेवराई) या तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून स्कॉर्पिओ जप्त करण्यात आली आहे. त्यांनरत सपोनि सानप व त्यांची टिम बीडकडे निघाली असता सकाळी ७. ४५ वा. जप्ती पारगाव जवळ वाळूची चोरटी वाहतुक करणारा हायवा रस्त्याच्या कडेला उभा होता. चालकाकडे पावत्या व इतर बाबींची चौकशी केली असता हायवामधील वाळू ही बेकायदेशिर असल्याचे निदर्शनास आल्याने वाळूने भरलेला हायवा बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात आणण्यात आला. हायवा चालक गणेश भगवान गुजर (वय-३६, रा. जवरवाडी, ता. गेवराई) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून हायवासह ४५ लाख ३५ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई जिल्हा वाहतुक शाखेचे सपोनि सुभाष सानप, पोह शिंदे, काकडे, दराडे, टुले, कदम यांनी केली.

------------------------------

### केंद्राने आरक्षणाची पन्नास टक्क्याची

याबाबत चर्चा झाली. आता तुमच्यामार्फत असे सुचवू इच्छितो की, मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलवावी. त्यांनी योग्य वाटतील त्या लोकांना बोलवावे. आम्ही विरोधी पक्ष म्हणून बैठकीला हजर राहू, आमची भूमिका सहकार्याची राहील. हा प्रश्न मांडण्याच्या बाबत प्रकर्षाने ज्यांनी कष्ट घेतले त्या मनोज जरांगे पाटील यांनाही बैठकीला निमंत्रित करावे. दुसरा मुद्दा म्हणजे ओबीसी आरक्षणाचा, त्यांचे नेतृत्व करणारे जे कोणी घटक असतील, त्यांनाही बैठकीला निमंत्रित करावे. त्या संयुक्त बैठकीत आपण चर्चा करुन यामधून मार्ग काढण्याची भूमिका घ्यावी असे पवार म्हणाले.

-----------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. १३ ऑगस्ट २०२४


## योगेश्वरी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केले रसायनशास्त्र विषयाचे शिखर सेट

अंबाजोगाई : योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी पुण्याच्या श्रीमती सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय पात्रता (सेट)परीक्षेत मध्ये यश संपादन केले आहे.त्याात तेजस्विता



जाधव,कल्याणी देशमुख,शरद कांबळे,अमर माने या चार विद्यार्थ्यांचा समावेश आहे यातील शरद कांबळे हा विद्यार्थी डिपार्टमेंट ऑफ एटॉमीक एनर्जी मुंबई येथे संशोधनाचे कार्य करत आहे तर अमर माने हा विद्यार्थी हैदराबाद येथील आय. आय.सी.टी. येथे संशोधन करत आहे हे यश कायम सुरु राहण्यासाठी अविरत प्रयत करणार असल्याचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही.कानेटकर यांनी व्यक्त केले. महाविद्यालयातील अभ्यासिकेमुळेच गेल्या काही वर्षात यशाचा आलेख वाढत चालला आहे अशी माहिती विभागप्रमुख डॉ. एस.सी. जाधवर यांनी दिली. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉ सुरेश खुरसाले,अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष जी.बी.व्यास सचिव कमलाकर चौसाळकर, कार्यकारी उपाध्यक्ष ॲड.जगदीश चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेष वैद्य,सहसचिव भीमाशंकर शेटे, संचालक अंगद कऱ्हाड, प्रा.अभिजित लोहिया, उपप्राचार्य डॉ.आर.व्ही. कुलकर्णी यांच्यासह इतरांनी अभिनंदन केले आहे.

# शिक्षणाशिवाय कोणी मोठा होत नाही -महादेवानंद भारती

## पिंपळवंडी येथील श्री.स्वामी अमृत भारती विद्यालयात शालेय गणवेश वाटप व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात साजरा

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी खूप शिकून मोठे झाले पाहिजेत शिक्षणाशिवाय कोणी मोठे होत नाही,तुम्ही मोठे झालात तर त्याातच आमचा आनंद आहे.शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते घेणारा गुरगुरनारच उच्च शिक्षण घेऊन स्वतःचे कर्तव्य सिद्ध करा.असे प्रतिपादन गुरुवर्य महंत ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज यांनी शालेय गणवेश वाटप व गुणवंत विद्यार्थी सत्कार प्रसंगी केले.पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.गंगा भारती महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,श्री.स्वामी अमृत भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त तसेच प्रतिवर्षाप्रमाणे संत निवृत्तीनाथ महाराज विश्वस्त मंडळ पुणे यांच्या वतीने शालेय गणवेश वाटप व या विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ रविवार दि.११ ऑगस्ट २०२४ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री.अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज संस्थापक अध्यक्ष श्री.गंगा भारती महाराज शिक्षण प्रसारक मंडळ हे होते.तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे ह.भ.प. परमानंद महाराज,परमेश्वर येवले, युवराज काशिद,देविदास धस,दिलीप गोरे,कैलास थोपटे,बाळासाहेब गोगल, लोणकर साहेब,अर्जुनराव खामकर साहेब, यश आजबे,ॲड.नरसिंह जाधव,अभिजीत घाडगे,ॲड.एन.एन.साबळे,अर्जुन बनकर,भाऊसाहेब भवर, उपजिल्हाधिकारी सुभाष काकडे,माजी प्राचार्य जोगदंड सर,परमेश्वर शेळके,जानू पठाण सर,निलेश मोरे,उद्धवशेठ पवार,दादासाहेब पवार, शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, राजाभाऊ तांबे,भागवत खरमाटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख पाहुणे मान्यवरांचे शुभहस्ते २०२३ मधील ५ वीतील शिष्यवृत्तीधारक उत्तीर्ण व पात्र आठवीतील शिष्यवृत्तीधारक एन.एम. एस शिष्यवृत्तीधारक १० वी,१२वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचे नेट परीक्षेत पवन थोरवे,यश पवार यशस्वी झालेल्या



विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येऊन इयत्ता ५ वी ते ८ वी तील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी दिलीप गोरे,देविदास धस,कैलास थोपटे,अभिजीत घाडगे, नागनाथ शिंदे,ॲड.नरसिंह जाधव, उपजिल्हाधिकारी सुभाष काकडे आदिसह महंत महादेवानंद भारती महाराज यांनी भाषणातून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.यावेळी प्रमुख पाहुण्यांनी भाषणातून महंत महादेवानंद भारती महाराज यांनी अध्यात्मिक क्षेत्राबरोबर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय करून पिंपळवंडी परिसर सिंचनातून परिसराचे नंदनवन बनवून शेतकऱ्यांसाठी या ठिकाणी साठवण तलाव वरदान ठरलेला आहे. महादेवानंद भारती महाराज यांनी भाषणातून विद्यार्थ्यांनी थोर नेत्यांचा आदर्श घेतला पाहिजे.छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आचरणात आणून कार्य केले पाहिजे.सावित्रीबाई फुले ह्या खऱ्या सरस्वती होत्याा. मुलींसाठी शिक्षणाचे खरे कार्य सावित्रीबाई फुले यांनीच केले.महात्मा गांधी व महात्मा फुले हे खरोखरच महात्मा होऊन गेले.छत्रपती शिवाजी महाराजांचे गावोगावी मंदिर बांधली पाहिजेत.त्यांच्यामुळेच आज आपण आहोत,आमच्या अंगावर भगवे वस्त्र व मंदिराला कळस व महिलांचे कुंकू सुरक्षित आहे.त्यांच्या राज्य कारभारात सर्व धर्माचे समाजाचे लोक होते. म्हणूनच ते आदर्श राजा होते.मला समाजकार्य खूप आवडते मी कोणाला काही मागत नाही मी कुणाला काहीही मागणार नाही मला कोणी काही दिले पाहिजे ही माझी भावना नाही.कोणी देऊ म्हणाले ते नाही दिले तरी त्याबद्दल मला काही खंत वाटत नाही, असे मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाला सरपंच अशोक जेधे,महेश खेंगरे,उद्धव रहाटे,विनोद देवकर, अमित अडसूळ,डी.एस.पवार,पिनू पोकळे,अर्जुन पवार,दत्तात्रय सांगळे सर,बंडू पवार,देविदास कापसे,बद्री पवार,परमेश्वर सातपुते,बाबासाहेब जाधव,दादासाहेब सादोलकर आदिसह आजी-माजी सरपंच-उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन,पत्रकार तसेच पालक- ग्रामस्थ व सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक दिलीप पवार सर व सूत्रसंचालन प्रताप पवार सर यांनी केले आहे.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षिका व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले

१).महंत महादेवानंद भारती महाराज यांनी युवा नेते भाऊसाहेब भवर यांचे विशेष कौतुक करून भवर हे मूळचे आपल्या पिंपळवंडी येथील चंद्रेवाडी गावचेच आहेत,भवर यांना व्यासपीठावर उभे करून त्यांची श्रोत्यांना ओळख करून देऊन त्यांचे राजकारणाबरोबर धार्मिक कार्यातही मोठे सहकार्य व योगदान असते असा उल्लेख करून त्यांना त्यांच्या राजकीय वाटचालीस शुभेच्छा व आशिर्वाद दिला.तसेच त्यांच्या मार्फत श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग येथील चौथा श्रावणी सोमवार यात्रा उत्साहात सप्ताह समाप्तीला भाविक-भक्तांना महाप्रसादाची पंगत मागील काही वर्षापासून देण्यात येत आहे.

२).देविदास धस यांनी याप्रसंगी १० वी १२ वीत या विद्यालयाचे जे विद्यार्थी ९९% मार्क घेतील त्यांना प्रत्योकी १ तोळा सोने बक्षीस जाहीर केले.

## स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या वर्धापन दिनी शेकडो कार्यकर्त्यांचा होणार जाहीर प्रवेश – विजय साळवे

**माजलगाव । प्रतिनिधी**

स्वाभिमान सेनेचा पहिला वर्धापन १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्या दिनी साजरा करण्यात येणार आहे. प्रसंगी शेकडो कार्यकर्ते संघटणेत प्रवेश करणार असुन या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थापक अध्यक्ष विजय साळवे यांच्या वतीने करण्यात आले आहे.



दिनांक ११ ऑगस्ट रोजी शहरातील व्यंकटेश हॉटेल मध्ये स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे कोअर कमिटी सदस्य चंद्रकांत टाकणखार यांच्या अध्यक्षते खाली प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली असता स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष विजय साळवे यांनी सांगितले की दिनांक १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्या दिनी स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचा पहिला वर्धापन दिन हॉटेल व्यंकटेश येथे साजरा करण्यात येणार आहे प्रसंगी तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते संघटनेत जाहीर प्रवेश करणार आहेत. तसेच शहर कार्यकारिणीची निवड करण्यात येणार आहे.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून आरपीआयचे अध्यक्ष दिनेश हानवते , उद्योजक तथा संस्थापक विजयकुमार वाव्हळ , मराठा आरक्षण संघर्ष समितीचे नेते ऋषिकेश बेदरे , उद्योजक सोमनाथ चांदमारे यांची उपस्थिती राहणार आसल्याचे विजय साळवे यांनी सांगितले आहे या वेळी कोअर कमिटी सदस्य बी.जी. शिंदे , अंजेराम घनघाव, वशिष्ठ लांडगे , विशाल ससाने , भास्कर पौळ , धम्मानंद गावडे , सय्यद अनवर , गंगाधर सोनपसारे , वैजनाथ गडसिंग , राजु मोरे , सुग्रीव शिंगाडे , सय्यद नाजेर , शेख अर्शद , आनंद साळवे , गौतम सोनपसारे , गणेश ढगे , सय्यद अकबर , उत्तम सोनपसारे यांची उपस्थिती होती. या वैभवशाली सोहळ्या निमित्त भिम गितांचा जंगी कार्यक्रम होणार असून तालूक्यातील सर्व भिम सैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आव्हाण संघटणेच्या वतीने करण्यात आले आहे.

## मानवाला गुलामीतून आझाद करण्यासाठीच आझाद क्रांती सेना -राजेश घोडे

### उमरी (बु) येथे आझाद क्रांती सेनेची शाखा स्थापना

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील उमरी बुद्रुक तालुका येथे दि ११ ऑगस्ट रविवार रोजी आझाद क्रांती सेनेच्या शाखेची स्थापना करण्यात आली याप्रसंगी बोलताना आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेश घोडे म्हणाले की सामाजिक, आर्थिक,राजकीय, सांस्कृतिक परिवर्तन करण्यासाठी आझाद क्रांती सेनेच्या शाखेतची स्थापना करण्यात आली आहे.

समाजामध्ये आर्थिक सामाजिक राजकीय व शैक्षणिक विषमता असल्याने ही विषमता जाळण्यासाठी सर्वांनी एकजुटीने रस्त्यावरील



लढाई लढण्यासाठी व फुले,शाहू, बाबासाहेब, अण्णाभाऊ चा विचार समाजामध्ये स्थापित करण्यासाठी एकीची मोठ बांधली पाहिजे त्याशिवाय न्याय मिळणार नाही असे मत व्यक्त केले. आझाद क्रांती सेनेच्या शाखेची फित कापून माजलगाव शहराचे शहराध्यक्ष अखिल बिल्डर यांनी उद्घाटन झाल्याचे जाहीर केले.या शाखेच्या कार्यक्रम प्रसंग आझाद क्रांती सेना नेते तुकाराम शिंदे,शाखाध्यक्ष सुरत शिरसागर, उपाध्यक्ष विजय गवारे,शाखा सचिव दादा क्षीरसागर, आनंद शिंदे,दिगंबर शिंदे,अनिल शिंदे, परमेश्वर शिरसागर, भारत मेंडके,राहुल साळवे,किशोर काळे आदींनी परिश्रम घेतले

पान ६ वरून...

### दिवसा जबरी चोरी करणारे सराईत

सिंदखेडराजा जि. बुलढाणा पर्यंत पाठलाग केला. आरोपी पुन्हा जालना जिल्हयाकडे निघाल्याने त्यांना कन्हैया नगर चौफुली येथे शिताफीने ताब्यात घेऊन त्यांना ताब्यात घेण्यात येऊन त्याने गुन्हा केल्याचे कबुली देऊन त्याचे कडुन एकुण ७,१४,३८० रुपये किमतीचा गुन्हयात गेलेला रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने, गुन्हया करतांना वापरलेले हत्यार, गुन्हयात वापरण्यात आलेली चारचाकी वाहन असे जप्त करण्यात आले असुन नमुद दोन्ही आरोपीतांना पुढील तपासकामी तालुका जालना पोलीस ठाणे जालना यांच्या ताब्यात दिले आहे. सदर आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन सागरसिंग फंट्यांसिग अंधरेले उर्फ बावरी याचे वर ३१ मालाविरुद्धचे गुन्हे तसेच अर्जुनसिंग छगनसिंग भोंड याचे विरुद्ध २७ मालाविरुद्धचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. योगेश उबाळे, सपोनि श्री. शांतीलाल चव्हाण, पोउपनि श्री. राजेंद्र वाघ सोबत पोलीस अंमलदार सैम्युअल कांबळे, कृष्णा तंगे, रमेश राठोड, रामप्रसाद पहरे, भाऊराव गायके, लक्ष्मीकांत आडेप, सुधीर वाघमारे, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, ईरशाद पटेल, सतिश श्रीवास, आक्रूर घांडगे, देविदास भोजणे, संदीप चिचोले, धीरज भोसले, योगेश सहाने सर्व स्थागुशा, कारवाई केली.

### वाहतुकीचे नियम काटेकोरपणे

या शाळांना झाले सायकलींचे वाटप

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने गरीब व होतकरू कुटूंबातील विद्यार्थीनींना शाळेत ४ ते ५ कि.मी. अंतर्गत चालत येणाऱ्या मुलींना सायकल देण्याचा उपक्रम रोटरी क्लबच्या वतीन राबविण्यात आला. यावेळी ५१ सायकलींचे वाटप वेणुताई चव्हाण कन्या शाळा, खोलेश्वर विद्यालय, गुरूदेव विद्यालय, मोरेवाडी, सोमेश्वर कन्या प्रशाला घाटनांदुर, सानेगुरूजी विद्यालय भावठाणा, वैणगंगा विद्यालय मांडवा व हिवरा येथील शाळेतील विद्यार्थीनींना या सायकलींचे वाटप करण्यात आले.

### लवुळ ग्रामपंचायत अंतर्गत

ठिकाणी करण्यात आलेली आहे. या दोन्ही कामाविषयी संबंधित अभियंता व कंत्राटदार यांना विचारणा केली असता त्यांच्याकडून उडवा उडवीचे उत्तरे दिली जात आहेत. या कामांमध्ये कुणीही लक्ष देऊ नये,आम्ही जे करत आहोत ते बरोबर आहे. व तुम्ही इकडे सुद्धा येऊ नका, अशा प्रकारचे उत्तरे देऊन नागरीकांना धमकावून तेथून निघून जाण्यास भाग पाडले जात आहे. साम दाम दंडाचा वापर करून येथे थातूरमातूर कामे केली जात आहेत. या दोन्ही कामाची चौकशी आठ दिवसाच्या आत करून संबंधित अभियंता व कंत्राटदार यांच्यावर संबंधित समितीच्या विभागाने पाहणी करून योग्य ती कारवाई करावी अथवा दिनांक १५ ऑगस्ट २०२४ गुरुवार रोजी स्वातंत्र्यादिनी रोजी ग्रामपंचायत कार्यालय लवूळ येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते सुग्रीव शिंगाडे, स्वाभिमानी रिपब्लिकन सेना कोअर कमिटी सदस्य बी. जी शिंदे, ग्रामपंचायत सदस्य दत्ता मोरे, विठ्ठल राठोड, शहाबाज शेख व विनोद राठोड यांनी निवेदनाद्वारे उपअभियंता जिल्हापरिषद बांधकाम उपविभाग, ग्रामविकास अधिकारी लवुळ ग्रामपंचायत व माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन माजलगाव यांना दिलेल्या निवेदनाव्दारे मागणी केली आहे.

### हद्दपार आरोपीस पाटोदा

अन्वये, बीड जिल्हयातुन एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले होते. त्यास दिनांक २१/०६/२०२४ रोजी पोलीस ठाणे पाटोदा ठाणे दैणंदिनी क्र १२ वेळ १४.२३ अन्वये वर नमुद आदेशाची नोटीस तामिल करण्यात येवुन त्याचा जबाब नोंदविण्यात येवुन नमुद जबाबामध्ये त्याने त्याचे एक वर्षाचे तडीपार कालावधीमध्ये त्याचे नातेवाईक नामे शिवाजी महादेव चव्हाण रा. पारगाव ता वाशी जि. धाराशिव (उस्मानाबाद) यांचेकडे राहणार असलेबाबत सांगितले होते.नमुद ईसम यास तो बीड जिल्हयातून तडीपार असलेने त्याने पोलीस ठाणे पाटोदा हद्दीत प्रवेश करण्यासाठी मा. उपविभागीय अधिकारी पाटोदा तसेच वरीष्ठ कार्यालयाची पुर्वपरवानगी घेतली होती काय किवा कसे याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणत्याही प्रकारची पुर्वपरवानगी घेतली नाही असे सांगितले. तरी ईसम नामे निलेश उत्तम अडागळे रा. महासांगवी ता पाटोदा जि.बीड हा मा. मा. उपविभागीय अधिकारी पाटोदा यांचे वर नमुद आदेशान्वये एक वर्षासाठी बीड जिल्हयातुन तडीपार असताना, मा. उपविभागीय अधिकारी पाटोदा यांचे आदेशाचे उल्लंघन करुन विनापरवाना बेकायदेशीररीत्या पोलीस ठाणे पाटोदा जि. बीड हद्दीमध्ये प्रवेश केला म्हणुन त्याचे विरुध्द कलम १४२ महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ प्रमाणे पोलीस अंमलदार संजय पवार यांचे फिर्यादीवरून कायदेशीर गुन्हा दाखल करून सदर गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक उद्धव गडकर यांच्याकडे दिल्याने त्यांनी त्यास मा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पाटोदा यांचे न्यायालयात हजर केले.

# रोटरी क्लबचे कार्य प्रेरणादायी -प्रदीप निफाडकर

**माजलगाव । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी व इनरव्हील क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या पदग्रहण सोहळ्याच्या कार्यक्रम प्रसिद्ध गझलकार प्रदीप निफाडकर व रोटरीचे प्रांतपाल डॉक्टर सुरेश साबू , सहाय्यक प्रांतपाल विवेक जी.गंगणे यांच्या प्रमूख उपस्थितीत दि १० ऑगस्ट शनिवार रोजी येथील वैष्णवी मंगल कार्यालयात पार पडला. रोटरीचे नूतन अध्यक्ष म्हणून रवींद्र कानडे व सचिव म्हणून सौ लता जोशी यांनी पदभार स्वीकारला तसेच इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष म्हणून सो. प्राजक्ता गुंडेवार व सचिव म्हणून सौ. स्मिता कानडे यांनी पदभार स्वीकारला.

मावळते अध्यक्ष रोटरियन राजेश देशपांडे व सचिव डॉ मधुकर घुबडे यांनी हा पदभार सुपूर्द केला.क्लबचा कारभार अतिशय प्रेरणादायी असल्याचे रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे प्रांतपाल रो डॉ. सुरेश साबू यांनी व्यक्त केले रोटरीच्या द रोटरी फाऊंडेशन बद्दल माहिती दिली.

प्रसिद्ध गझलकार प्रदीप निफाडकर यांनी रोटरीच्या समाजाभिमुख कार्यक्रमांची प्रशंसा केली आणि आपल्या दिलखुलास गझलांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले त्यांनी सादर केलेल्या माझी मुलगी या गझलेने सर्वानाच अंतर्मुख केले.कार्यक्रमाची सुरुवात सुंदरश्या, इतनी शक्ती हमें दे ना दाता या गीताने झाली रो डॉ.स्वानंद कुलकर्णी यांनी




### रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचा पदग्रहण समारंभ संपन्न

प्रास्ताविक केले तर मावळते अध्यक्ष रो. राजेश देशपांडे यांनी गत वर्षीचा क्लबचा आढावा मांडला अध्यक्ष रो. रवींद्र कानडे यांनी सर्वांच्या सहकार्याने यावर्षी क्लब करणार असणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली कवयत्री रो. स्मिता लिंबगावकर यांनी आपल्या ओघवत्याा शैलीत केलेल्या सूत्र संचालनाने कार्यक्रमाची रंगत वाढली आभार सचिव रो.लता जोशी यांनी मानले.या कार्यक्रमासाठी माजी आमदार राधाकृष्ण होकें पाटील,माजी आमदार मोहनराव सोळंके, भाजपाचे नेते रमेशराव आडसकर, नारायणराव डक, ज्योतीताई डक,सुरेंद्र रेदासणी, ॲड विश्वास जोश, ॲड भानुदास डक, डॉक्टर सुरेश साबळे,डॉक्टर यशवंत राजेभोसले,अमरनाथ खुर्पे,प्रकाश दुगड यांच्या सह मोठ्या प्रमाणात माजलगाव व परिसरातील प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी व इनरव्हील क्लबचे सर्व सदस्यांचे उपस्थिती होती.पदग्रहण सोहळ्याच्या निमित्ताने, पर्यावरण पूरक कापडी पिशवींचे वाटप करण्यात आले,शिरूर येथील सर्पराज्ञी प्रकल्पाचे संचालक सिद्धार्थ सोनवणेआणि सौ. सृष्टी सोनवणे यांना भरीव आर्थिक मदत केली गेली तसेच,ग्रामीण भागातील शालेय मुलींसाठी पाच सायकलचे वाटप करण्यात आले.रोटरी क्लबचे मुखपत्र असणाऱ्या दृष्टीक्षेप या बुलेटीनचे प्रकाशन देखील करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रोजेक्ट चेअरमन म्हणून डॉक्टर स्वानंद कुलकर्णी यांनी काम पाहिले तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोटरी डिस्ट्रिक्ट सदस्य सुरेश भानप,सहाय्यक प्रांतपाल डॉक्टर शंकर जुजगर, गोविंद बजाज, निरंजन वाघमारे, दिगंबर महाजन, डॉक्टर अर्चना पवार,डॉक्टर अंजली अकोलकर यांच्यासह सर्व रोटरी सदस्यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीतानंतर सुरुची भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## विकास कामांमुळेच जनतेची साथ आणि आशीर्वाद आपल्या पाठीशी - आ. गोरंट्याल

जालना । प्रतिनीधी

जालना शहर आणि मतदार संघातील विकास कामांना आपण नेहमीच प्राधान्य दिले आहे. या विकास कामांमुळेच जनता आपल्या पाठीशी भक्कमपणे उभी असून त्यांची ही साथ आणि आशीर्वाद देखील आपल्याच पाठीशी राहील असा ठाम विश्वास आ. कैलास गोरंट्याल यांनी येथे बोलतांना व्यक्त केला.

जालना शहरातील अंबड रोडवरील पांगारकर नगर मध्ये इंद्र दरबार हॉटेल ते जि.प.कर्मचारी सहकारी पतसंस्था या रस्त्याच्या सिमेंटीकरण, भूमिगत गटार योजना आणि पेव्हर ब्लॉक कामाचे भूमिपूजन काल रविवारी आ. कैलास गोरंट्याल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी बी. एस. कराड, वाघतकर, देशपांडे, काळूशे, कांबळे, शिंगणे, साबळे, शिंदे,भाबड, खेडकर,



नागरगोजे, मुंडे, राजगुरू, क्षीरसागर, राम सावंत, माजी नगरसेवक विनोद रतपारखे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना आ. गोरंट्याल म्हणाले की, जायकवाडी - जालना या पाणी पुरवठा योजनेमुळे शहरातील जनतेला किमान आठ दिवसाला तरी पाणी पुरवठा होत आहे. ही योजना कार्यान्वित झाल्याने जालनेकरांवरचे संकट दूर होण्यास मोठी मदत झाली असून जालना येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करून आणण्यासाठी देखील आपल्याला राज्य सरकारशी मोठा संघर्ष करावा लागला आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनातही आपण मेडिकल कॉलेजसाठी आग्रही भूमिका मांडली आणि त्यामुळेच सरकारने सकारात्मक प्रतिसाद देत या कॉलेजची इमारत बांधकाम व अन्य कामांसाठी ४०४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. आपल्या शेजारी असलेल्या जिल्ह्यात कोणते ना कोणते विद्यापीठ असून तसेच एखादे विद्यापीठ जालना येथे व्हावे यासाठी भविष्यात आपण प्रयतशील राहणार असल्याचे आ. गोरंटयाल यांनी यावेळी स्पष्ट केले. तत्पूर्वी परिसरातील ज्येष्ठ नागरिक श्री बी.एस. कराड, ढेंगळे आणि विनोद रतपारखे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे नियोजन शिलाताई ढाकणे यांनी केले. सुत्रसंचालन सौ. प्रभाताई गायकवाड यांनी तर आभार प्रदर्शन सौ. मीनाताई देशपांडे यांनी मानले. या कार्यक्रमास सौ. उज्वला साबळे, सौ. संगिता काळुशे,सौ. विद्या खेडकर, सौ. अलका भाबड, सौ.शोभा शिंदे, सौ. सविता पाटील, सौ. पुष्पा क्षिरसागर, सौ. अर्चना गायकवाड, सौ. किरण शिंगणे, सौ. सविता वाघतकर, सौ. विद्या चव्हाण, सौ. सविता धोंड यांच्यासह परिसरातील महीला व पुरुष आणि युवकांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती.

## आयुष्य बदलायला कॅमेरा कारणीभूत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आंतरभारती शाखा अंबाजोगाई आयोजित मेरी बात ह्या उपक्रमाचा ६ वा भाग दिनांक १०/०८/२०२४ वार शनिवार रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमात कथा लेखक व उत्कृष्ट फोटोग्राफर असणारे, आंतरभारतीचे शहर अध्यक्ष दत्ता वालेकर यांनी आपला संघर्षमय जीवनाचा सारांश आपल्या मनोगतातून व्यक्त केला.

आपला जीवन संघर्ष वर्णन करताना त्यांनी सांगितले की, आर्थिक परिस्थितीमुळे प्राथमिक शिक्षण वेळेत पूर्ण करता आले नाही. आर्थिक परिस्थिती हालाखीची होती. वेळ प्रसंगी शेळ्या राखून, गुरे सांभाळून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवला. पहिल्या पासून वाचनाची आवड निर्माण झाली होती. सानेगुरुजीचे पुस्तक वाचनात आले व जीवनाला नवी दिशा मिळाली. पुढे व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन फोटोग्राफीच्या व्यवसायातून स्वतःची ओळख निर्माण केली. हातात कॅमेरा आला आणि जीवन बदलून गेले. शिक्षण पूर्ण झाल्या नंतर लिखाणाची आवड निर्माण झाली. कथा, कविता लिहू लागलो व हा छंद जोपासलाही. असे दत्ता वालेकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले. सुरुवातीच्या काळात शिक्षणाअभावी कुटुंबाचा संघर्ष व पुढील आयुष्यात व्यावसायिक शिक्षणातून फोटोग्राफी या कौशल्य गुणामुळे प्रकाशझोतात येण्यासाठी अनेक संधी मिळाल्या, याचे प्रवास वर्णन त्यांनी 'मेरी बात' या कार्यक्रमातून करून दिली. हा जो बदल झाला तो सानेगुरुजी यांचे पुस्तक वाचनामुळे व कॅमेरा हाताळण्याचे कौशल्य संपादन केल्यामुळे झाला असे त्यांनी ठामपणे सांगितले.

हा कार्यक्रम अंबाजोगाई येथील मानवलोक जनसहयोग कार्यालयातील बालकमंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सभागृहात संपन्न झाला. मनोगत सादरकर्ते दत्ता वालेकर यांचे स्वागत दत्तात्रय गावरस्कर यांनी संविधान उद्देशिका व पुस्तक भेट देऊन केले. मेरी बातचे संयोजक व्यंकटेश जोशी यांनी स्वागत गीत गायले. या कार्यक्रमासाठी आंतरभारतीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष अमर हबीब यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यंकटेश जोशी यांनी केले.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
४
मंगळवार दि.१३ ऑगस्ट २०२४

# नोकरी सोडून पिकवली कोरफड

## साताऱ्याच्या युवा शेतकऱ्याची वार्षिक उलाढाल तब्बल ३.५ कोटी!

आधुनिक शेतीची कास धरत आजकाल अनेक शेतकरी लाखोंची उलाढाल करताना दिसतात. शिक्षण झालं की नोकरीच्या मागे न लागता महाराष्ट्रात अनेकांनी शेती करणं पसंत केल्याची आता अनेक उदाहरणं आहेत. साताऱ्यात नोकरी सोडून एका युवा शेतकऱ्यानं त्याच्या शेतात कोरफड लावली. आता आंतराष्ट्रीय मागणीमुळे तसेच देशांतर्गत कोरफडीच्या अनेक पदार्थांची मागणी होत असताना त्याला मोठा फायदा झालाय. केवळ कोरफडीतून त्यानं वर्षाला साडेतीन कोटींची उलाढाल केलीये. कोरफड लागवडीतून आणि त्यातून बनवलेल्या उत्पादनातून ३० टक्के नफा कमवत त्यानं तब्बल ३.५ कोटी रुपये कमावलेत. 'द वोकल न्यूज'च्या वृत्तानुसार हृषिकेश ढाणे असं या तरुण शेतकऱ्याचं नाव आहे. चिकाटी आणि नाविन्यपूर्णतेने शेती करत त्यानं त्याच्यासह कुटुंबाचीही आर्थिक प्रगती साधलीये.

पारंपरिक पिकांना फाटा देत केली कोरफड शेती

जगभरात सध्या कोरफडीसह आयुर्वेदिक आणि शाश्वत गोष्टी वापरण्यावर बहुतांश जणांचा भर



असल्याचं दिसून येतं. त्वचेसह शरीराच्या अनेक आजारांवर रामबाण समजली जाणारी कोरफड भारतासह परदेशातही सर्रासपणे वापरताना दिसतात. कोरफडीचे महत्व लक्षात घेत आपल्या जमिनीवर कोरफड लावण्याची कल्पना खरंतर धाडसाचीच. पारंपरिकतेचा मोह जुन्या शेतकऱ्यांना सुटणं तसं कठीण असताना ऋषिकेशनं कुतुहलानं कोरफड लावली आणि हा निर्णय त्याचं नशीब बदलणारा ठरला. आता सरासरी ८ हजार लिटर कोरफडीपासून उत्पादने बनवून कोट्यवधी रुपये कमवत आहे.

टाकून दिलेल्या कोरफडीतून झाली सुरुवात

साताऱ्यातील पाडळी येथील शेतकऱ्यांना पहिल्यांदा कोरफडीची लागवड करण्याची कल्पनेची एका व्यावसायिकाने ओळख करून दिली. 'कोरफड वाढवा, लाखो कमवा' या घोषणेचं ऋषिकेशला कुतुहल वाटलं.

अधिक चौकशी केली असता त्याला हा सगळाच प्रकार संशयास्पद वाटला. पण तोपर्यंत गावातल्यांनी कोरफड लावली होती. जसजशी कापणीची वेळ जवळ येऊ लागली तसा व्यापारी गायब झाला. आणि शेतकऱ्यांच्या कोरफडीला कोणी वाली उरला नाही. त्यातील कित्येकांनी कोरफड अक्षरश: टाकून दिली. ऋषिकेशने या शेतकऱ्यांची टाकून दिलेल्या कोरफडीची रोपे आणून स्वत:च्या शेतात लावली. आणि आता त्याची कमाई पाहून गावातील शेतकऱ्यांनाही प्रेरणा मिळाली आहे.

### मार्केटिंग कंपनीतील नोकरी सोडली आणि रोपवाटीका केली सुरु

कौटुंबिक परिस्थिती बेताची असल्याने वयाच्या २० व्या वर्षी ऋषिकेशने मार्केटिंग कंपनीत नोकरी केली. परंतू ती टिकली नाही.त्यामुळं त्यानं गावात एक रोपवाटिका सुरु केली. २००७ मध्ये जेव्हा गावातील लोकांनी कोरफड टाकून दिली तेंव्हा त्याकडे ऋषिकेशने एक संधी म्हणून पाहिले आणि ४००० कोरफडीची रोपे लावली. त्यापासून त्याने साबण, शॅम्पू, ज्यूस अशी विविध उत्पादने तयार करण्यास सुरुवात केली.२०१३ पर्यंत त्यानं कोरफडीच्या उत्पादनांचं व्यवसायात रुपांतर करण्याचा निर्णय घेतला.

# केळीची कमी उंचीची 'कावेरी वामन' जात विकसित

केळी राष्ट्रीय संशोधन केंद्र तिरुचिरापल्ली (आयसीएआर) द्वारे अलीकडेच कावेरी वामन नावाची केळीचे एक प्रभावी वाण सादर करण्यात आले आहे. एक दिवस एक उत्पादन योजने अंतर्गत कावेरी वामन नावाची केळीचे एक प्रभावी वाण सादर करण्यात आले आहे.

केळीची ही ठेंगणी जात व्यावसायिक उत्पादक आणि घरगुती बागेतही लागवडीसाठी फायदेशीर आहे. या जातीची मुख्य वैशिष्ट्ये आणि फायदे जाणून घेऊ या.

'कावेरी वामन' केळीची प्रमुख वैशिष्ट्ये : कावेरी वामन ही केळीची जात फक्त १५०-१६० सेमी पर्यंत वाढते, ज्यामुळे मर्यादित जागा असलेल्या भागांसाठी किंवा उच्च-घनतेच्या लागवडीसाठी ही एक आदर्श आदर्श जात आहे. प्रत्येक झाडात ८-१० मध्यम आकाराचे घड तयार होते. फळे घडात कॉम्पॅक्टपणे सेट असतात ज्यामुळे घडाच्या एकूण वजन योग्य असते. प्रत्येक घडाचे वजन १८ ते २५ किलो पर्यंत असते, ज्यामुळे उत्पादकांना चांगले उत्पादन मिळते. ही जात उच्च-घनतेच्या लागवडीसाठी योग्य आहे, ज्यामुळे दिलेल्या क्षेत्रात अधिक झाडे लावता येतात, त्यामुळे उत्पादकता वाढते. कावेरी वामन केळी त्याच्या मजबूत संरचनेमुळे वारा-प्रवण भागात लागवडीसाठी योग्य आहे. त्याचा कॉम्पॅक्ट आकारामुळे ही जात टेरेस गार्डनिंगसाठी सुद्धा योग्य आहे. शहरातील लोकसुद्धा मर्यादित जागेत या




केळीची लागवड करू शकतात. या जातीला प्रॉपिंग किंवा आधार देण्याची आवश्यकता नसते, ज्यामुळे लागवडीचा खर्च १०-१५% कमी होतो, ज्यामुळे ते शेतकर्यांसाठी एक आर्थिक पर्याय बनते. शेतकऱ्यांसाठी फायदेशीर जात : कावेरी वामन केळी जाती उत्पादकांना अनेक फायदे देते. त्याची कॉम्पॅक्ट उंची वाऱ्यामुळे होणाऱ्या नुकसानीचा धोका कमी करते आणि फळांची दाट मांडणी भरीव उत्पन्नाची खात्री देते. प्रोपिंग/स्टेकिंगची (आधार देण्याची) गरज नसल्याने वेळ आणि संसाधने दोन्ही वाचतात, ज्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो. शहरी आणि ग्रामीण सेटिंग्जसाठी आदर्श : तुम्ही व्यावसायिक केळी उत्पादक असाल किंवा मर्यादित जागेसह बागकाम करणारे उत्साही असाल, तर कावेरी वामन केळी हा एक उत्कृष्ट पर्याय आहे. विविध वातावरणात अनुकूलता आणि आव्हानात्मक हवामानाचा प्रतिकार यामुळे ती विविध कृषी पद्धतींसाठी उपयुक्त अशी ही बहुमुखी जात आहे.

# सोयाबीनवर पुन्हा पिवळा मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव

महाराष्ट्रात खरीपात मराठवाड्यात सर्वाधिक पेरल्या जाणाऱ्या सोयाबीनवर आता पुन्हा एकदा पिवळ्या मोझॅकसह विषाणूजन्य हिरवा मोझॅकचा प्रादुर्भाव दिसून आलाय. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्याने सोयाबीन उत्पन्नात जवळपास ७५ टक्क्यांची घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर मोठं संकट उभं राहिलंय.

मागील वर्षी सोयाबीन शेतकऱ्यांना पावसाच्या तऱ्हेमुळे मोठं नुकसान झालं होतं. सरासरीपेक्षा कमी पाऊस आणि नंतर अतिवृष्टीमुळे सोयाबीनवर पिवळा मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने सोयाबीन पिकाने माना टाकल्याचे चित्र होते. परिणामी, अजूनही शेतकऱ्यांना सोयाबीनला हमीभाव मिळत नसल्याचे चित्र आहे. आता पुन्हा हा रोग पिकावर पसरला तर यंदाही सोयाबीन धोक्यात येण्याची शक्यता आहे.

या रोगाला रोखता येते का? : या दोन्ही प्रकारच्या मोझॅकमुळे झाडाच्या अन्ननिर्मिती प्रक्रियेमध्ये बाधा होऊन प्रादुर्भाव ग्रस्त झाडांना फुले आणि शेंगा लागत नाहीत त्यामुळे वेळीच या रोगाला ओळखून तसेच मावा व पांढऱ्या माशीचे नियंत्रण करून या रोगाचे व्यवस्थापन करता येते.परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील कीटकशास्त्र विभागाने या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना सुचवल्या आहेत नेमकं त्या काय



आहेत हे जाणुन घेऊयात.

सोयाबीनवरील मावा,पांढरी माशी आणि मोझॅक विषाणूचे एकात्मिक व्यवस्थापन १. काही सोयाबीन पिकाचे वाण या रोगास लवकर आणि जास्त प्रमाणात बळी पडतात. त्यामुळे या रोगास बळी पडणाऱ्या वाणाची लागवड न करता आपल्या भागात विद्यापीठाद्वारे शिफारस केलेल्या सोयाबीन वाणांचीच लागवड करावी. २. पेरणीस निरोगी बियाण्याचाच वापर करावा. ३. लागवडीनंतर वेळोवेळी पिकाचे कीड व रोगांसाठी निरीक्षण आणि सर्वेक्षण करावे. ४. मोझॅक(केवडा) झालेली प्रादुर्भावग्रस्त पाने, झाडे दिसून येताच ती वेळोवेळी तात्काळ समूळ काढून बांधावर न फेकता जाळून अथवा जमिनीत पुरून नष्ट करावीत जेणेकरून निरोगी झाडांवर होणारा किडीचा व रोगांचा प्रसार कमी करणे शक्य होईल. ५. रोगाच्या प्रसारास कारणीभूत असलेल्या मावा व पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी पिकावर रोगाची लक्षणे दिसताच किंवा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून थायमिथोक्झाम १२.६% + लॅम्बडा सिहॅलोथ्रीन ९.६% झेडसी ५० मिली (२.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात साध्या पंपाने) किंवा असिटामिप्रीड २५%+बाइफेन्थ्रीन २५ % डब्ल्यूजी १०० ग्रॅम (५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात साध्या पंपाने) किंवा बीटा साइफ्लुथ्रीन ८.४९%+इमिडाक्लोप्रीड १९.८१% ओडी १४० मिली (७ मिली प्रती १० लिटर पाण्यात साध्या पंपाने)यापैकी एका किटकनाशकाची फवारणी प्रति एकर याप्रमाणात करावी. ६. पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी पिकामध्ये प्रति एकरी १० पिवळे चिकट सापळे लावावेत. ७. फवारणीसाठी कीटकनाशकाची व पाण्याची शिफारस केलेली मात्राच वापरावी. ८. नत्रयुक्त खताचा अतिरिक्त वापर टाळून शिफारसीनुसारच करावा.९. मूग, उडीद यासारख्या पर्यायी खाद्य वनस्पतीवरून पिवळा मोझॅक रोगाचा प्रसार होण्यापासून रोखण्यासाठी अशा पिकावरील पांढरी माशीचे व्यवस्थापन करावे. १०. कमीत कमी पहिले ४५ दिवस पीक तणमुक्त ठेवावे. ११. पावसाचा ताण पडल्यास पिकास संरक्षित पाणी द्यावे. १२. बिगर हंगामी सोयाबीनची लागवड शक्यतो टाळावी जेणेकरून किडीच्या जीवनक्रमात खंड पडतो आणि पुढील हंगामात पर्यायाने किडींचा प्रादुर्भाव कमी राहतो.




### महत्वाच्या घटना

१६४२ : क्रिस्टियन हायगेन्स या शास्त्रज्ञाने मंगळाच्या दक्षिण धृवावरील बर्फाच्या टोप्यांचा शोध लावला.
१८९८ : कार्ल गुस्ताव्ह विट याने ४३३ या पृथ्वीजवळच्या पहिल्या लघुग्रहाचा शोध लावला.
१९१८ : बायरिसचे मोटर्न वेर्के एजी (बी.एम.डब्ल्यू.) ही सार्वजनिक कंपनी म्हणून स्थापन झाली.
१९५४ : रेडिओ पाकिस्तान वरुन 'कौमी तराना' हे पाकिस्तानचे राष्ट्रगीत प्रथमच प्रक्षेपित करण्यात आले.
१९६१ : आपल्या नागरिकांचे पश्चिम जर्मनीत होणारे स्थलांतर रोखण्यासाठी पूर्व जर्मनीने आपल्या सीमा बंद केल्या. बर्लिनची भिंत बांधण्यास सुरूवात झाली.
१९९१ : कन्नड साहित्यिक प्रा. विनायक कृष्ण गोकाक यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर
२००४ : ग्रीसमधील अथेन्स येथे २८ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली. सुमारे ३०० दूरचित्रवाणी वाहिन्यांवरुन अंदाजे ४ अब्ज लोकांनी हा उद्घाटन सोहळा पाहिला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८८ : जॉन लोगे बेअर्ड स्कॉटिश अभियंता आणि दूरचित्रवाणी चे संशोधक (मृत्यू: १४ जून १९४६)
१८९० : त्र्यंबक बापूजी ठोंबरे तथा 'बालकवी' १९०७ साली जळगाव येथे भरलेल्या पहिल्या कविसंमेलनात वयाच्या १७ व्या वर्षी त्यांनी केलेल्या कवितावाचनाने प्रभावित होऊन संमेलनाचे अध्यक्ष कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांनी त्यांना 'बालकवी' ही उपाधी देऊन त्यांचा गौरव केला. (मृत्यू: ५ मे १९१८)
१८९८ : प्रल्हाद केशव तथा आचार्य अत्रे लेखक, कवी, शिक्षणतज्ञ, संपादक, राजकीय नेते, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, पटकथालेखक आणि वक्ते (मृत्यू: १३ जून १९६९)
१८९९ : सर अल्फ्रेड हिचकॉक चित्रपट दिग्दर्शक (मृत्यू: २९ एप्रिल १९८०)
१९०६ : विनायक चिंतामण तथा विश्राम बेडेकर लेखक व दिग्दर्शक (मृत्यू: ३० आक्टोबर १९९८)
१९२६ : फिडेल कॅस्ट्रो क्यूबाचे १५ वे राष्ट्राध्यक्ष
१९३६ : वैजयंतीमाला बाली ऊर्फ 'वैजयंतीमाला ' चित्रपट अभिनेत्री
१९४५ : भारतीय-इंग्लिश क्रिकेटर रॉबिन जॅकमन यांचा जन्म.
१९८३ : संदीपन चंदा भारताचा ९ वा ग्रँडमास्टर

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९५ : महाराणी अहिल्याबाई होळकर देशातील अनेक महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रातील देवळांचा त्यांनी जीर्णोद्धार केला. (जन्म: ३१ मे १७२५)
१८२६ : स्टेथोस्कोप चे शोधक रेने लायेनेस्क यांचे निधन. (जन्म: १७ फेब्रुवारी १७८१)
१९१० : आधुनिक शुश्रूषा शास्त्राचा (नर्सिंग) पाया घालणार्या ब्रिटिश परिचारिका फ्लॉरेन्स नायटिंगेल यांचा जन्म. १९०७ मधे त्यांना 'ऑर्डर ऑफ मेरिट' हा किताब बहाल करण्यात आला. 'नोटस ऑफ नर्सिंग' हा त्यांचा ग्रंथ नावाजलेला आहे. (जन्म: १२ मे १८२०)
१९१७ : एडवर्ड बकनर आंबवण्याच्या प्रक्रियेसंबंधी केलेल्या संशोधनाबद्दल नोबेल पारितोषिक (१९०७) मिळवणारे जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: २० मे १८६०)
१९३६ : मॅडम भिकाजी रुस्तुम कामा या भारतीय क्रांतिकारक महिला व परदेशातील भारतीय क्रांतिकारकांच्या आधारस्तंभ होत्या. १९०७ मधे जर्मनीत भरलेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषदेत ब्रिटिशांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी भारतीय स्वातंत्र्यासंबंधी प्रस्ताव मांडला. त्याच वेळी भारतीय स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणून 'वंदे मातरम' हा मंत्र असलेला तिरंगी ध्वज त्यांनी फडकावला. (जन्म: २४ सप्टेंबर १८६१)
१९४६ : एच. जी. वेल्स विज्ञानकथांसाठी प्रसिद्ध असलेले इंग्लिश लेखक (जन्म: २१ सप्टेंबर १८६६)
१९८० : पुरुषोत्तम भास्कर तथा पु. भा. भावे अष्टपैलू आणि प्रतिभासंपन्न साहित्यिक (जन्म: १२ एप्रिल १९१०)
१९८५ : जे. विलार्ड मेरिऑट मेरिऑट कॉर्पोरेशनचे संस्थापक (जन्म: १७ सप्टेंबर १९००)
१९८८ : गजानन जागीरदार चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व अभिनेते, फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया'चे पहिले संचालक
२००० : नाझिया हसन पाकिस्तानी पॉप गायिका (जन्म: ३ एप्रिल १९६५)
२०१५ : हिरो सायकल चे सहसंस्थापक ओम प्रकाश मंजाल यांचे निधन. (जन्म: २६ ऑगस्ट १९२८)
२०१६ : भारतीय हिंदू नेते प्रमुख स्वामी महाराज यांचे निधन. (जन्म: ७ डिसेंबर १९२१)


# सीताफळातील एकात्मिक कीड-रोग नियंत्रण

सीताफळ हे कोरडवाहू भागातील महत्त्वाचे फळपीक आहे. सध्या राज्यातील सीताफळ लागवड क्षेत्रात चांगला पाऊस पडत असून, फळधारणेस अनुकूल परिस्थिती आहे. मात्र सततच्या पावसाने बागांमध्ये आर्द्रता टिकून राहत असल्याने रोग व किडींच्या प्रादुर्भावास पोषक वातावरण तयार झाले आहे. सध्या पूर्णपणे उमललेल्या कळ्या व लहान आकाराच्या फळांवर तपकिरी काळपट डाग आढळून येत आहेत. हे डाग नेमक्या कोणत्या कीड किंवा रोगामुळे आहेत, हे जाणून घेऊन त्यानुसार वेळीच योग्य त्या उपाययोजना कराव्यात.

थ्रिप्स (फुलकिडी) : फुलकिडीचे प्रौढ आणि पिले आकाराने लहान असून, ते नवीन आलेल्या कळ्या, नुकतीच फलधारणा झालेली फळे, पानाच्या पाठीमागील बाजूची मुख्य शिरा येथील पृष्ठभाग खरवडून बाहेर पडणारा द्रव शोषतात. परिणामी, नुकसान झालेला भाग तपकिरी रंगाचा होतो. कालांतराने तो काळपट पडतो. पाने वेडीवाकडी होतात. मोठ्या फळांवर देखील खरवडल्याचे डाग दिसून येतात. फळ वाढेल तसे खरवडल्याचे डाग वाढत जातात. प्रादुर्भावग्रस्त भाग कठीण होतो. फळांचा आकार वेडावाकडा होतो. परिणामी फळांना बाजारात अपेक्षित दर मिळत नाही.

मावा : मावा किडीचे प्रौढ आणि पिले नवीन आलेल्या कळ्यांमधून रस शोषून घेतात. ही कीड शरीरातून मधासारखा चिकट पदार्थ स्रवते. त्यावर काळी बुरशी वाढते. या किडीचा प्रादुर्भाव वाढल्यास फळधारणेवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

टी मॉस्किटो बग : 'टी मॉस्किटो बग' या रसशोषक किडीची पिले व प्रौढ सीताफळाच्या झाडांची कोवळी फूट, कळ्यांचा व फुलांचा देठ, कोवळी व पक्व फळे या भागामधून रस शोषून घेतात. ती सोंड घुसवून रस शोषत असल्याने त्या ठिकाणच्या पेशी काळ्या पडून कठीण होतात. तयार झालेल्या ठिपक्यांचा आकार पुढे मोठा होतो. तिथे करपल्यासारखा काळा डाग पडतो. या किडीमुळे होणाऱ्या जखमांमधून फळसड रोगाच्या बुरशीचा प्रवेश होऊन पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार शेंडेमर, शेंडे करपणे, कळ्या जळणे, फळे देठाजवळ काळी पडणे यासारखी लक्षणे



दिसून येतात.

उपाययोजना : ही कीड सीताफळ बागेत सध्या कमी प्रमाणात आढळत असली तरी तिची आर्थिक नुकसान पोहोचविण्याची क्षमता अधिक आहे. त्यामुळे या किडीबाबत सध्या सर्वेक्षण करून वेळीच व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. सीताफळाच्या बागेत स्वच्छता राखावी. नियोजनबद्ध एकात्मिक आणि संतुलित प्रमाणात खत व पाणी व्यवस्थापन करणे. किडीने आर्थिक नुकसानीची पातळी (५ टक्के नुकसानग्रस्त फळे) गाठल्यास किंवा या पेक्षा किडींची संख्या अधिक झाल्यास फवारणी करावी. (प्रमाण : प्रति १० लिटर पाणी) लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (५ ईसी) ६ मिलि किंवा बायफेन्थ्रीन (८ टक्के एससी) १२.५ मिलि किंवा थायाक्लोप्रिड (२१.७० टक्के एससी) १० मिलि. कीटकनाशकाची फवारणी करण्यापूर्वी काढणी पश्चात कालावधी तपासून फळकाढणीचा निर्णय घ्यावा.

पिठ्या ढेकूण (मिलीबग) : पिठ्या ढेकूण ही कीड पाने, कोवळ्या फांद्या, कळ्या आणि कोवळी फळे यातून रस शोषते. परिणामी, पानांचा, फळांचा आकार वेडावाकडा होतो. झाडांच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो. नवीन फुटींची व पानांची वाढ खुंटते. फळांची वाढ अयोग्य होऊन आकार वेडावाकडा होतो. या किडीच्या शरीरातून स्रवणाऱ्या मधासारखा चिकट पदार्थावर काळी बुरशी वाढते. परिणामी पाने, फळे काळी पडतात. फळांना बाजारभाव मिळत नाही.

उपाययोजना : पिठ्या ढेकणाची पिले खोडावरून झाडावर चढतात. यासाठी उपाय म्हणून ५ सेंटिमीटर रुंदीची प्लॅस्टिक चिकट पट्टी खोडाला चिकट बाजू वर ठेवून लावावी. त्याला पिले चिकटून मरतात. या किडीच्या पुढील प्रसाराला वेळीच आळा बसतो. परभक्षी मित्रकीटक क्रिटोलिमस मॉन्ट्रोझायरी प्रति एकरी ६०० या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ वेळा बागेत झाडावर सायंकाळच्या वेळी सोडावेत. भुंगेरे सोडल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या कीटकनाशकाची बागेवर फवारणी करू नये. लेकॅनोसिलिअम लेकानी (व्हर्टिसिलिअम लेकॅनी) हे जैविक बुरशीनाशक ५ ग्रॅम अधिक फिश ऑइल रोझीन सोप ५ ग्रॅम प्रतिलिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. आर्द्रतायुक्त हवामानामध्ये जैविक बुरशीनाशक उत्तम काम करते. त्यामुळे सध्या ही फवारणी फायदेशीर ठरेल.

फळसड : हा रोग कोलेटोट्रीकम ग्लिओस्पोराइडेस या बुरशीमुळे होतो. हा रोग आर्द्रतायुक्त दमट हवामानात अधिक दिसून येतो. मात्र कोरड्या हवामानात रोगाचे प्रमाण कमी असते. फळसड हा रोग फळवाढीच्या कुठल्याही अवस्थेत येऊ शकतो. मात्र कळ्या आणि लहान फळे रोगास जास्त प्रमाणात बळी पडतात. या अवस्थेत रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास कळ्या, लहान फळे आणि त्यांचे देठ काळे होऊन गळून पडतात. फळे मध्यम सुपारीच्या आकाराची (१५ ते २० मि.मी. व्यास) झाल्यावर प्रादुर्भाव झालेली फळे गळून न पडता लटकून राहतात. अशी रोगग्रस्त फळे न पिकता वाळून जातात व कडक होतात. अशाप्रकारे या रोगामुळे जवळजवळ ६० ते ७० टक्के नुकसान होण्याची शक्यता असते.

उपाययोजना : रोग व्यवस्थापनाच्या दृष्टीने बागेत वेळोवेळी नांगरट, जमीन तापू देणे आणि स्वच्छता या बाबी महत्त्वाच्या आहेत. छाटणी करतेवेळी गर्दी होत असलेल्या फांद्यांसोबतच झाडावर शिल्लक राहिलेली रोगग्रस्त फळे, फांद्या, पाने छाटून टाकावीत. छाटणीनंतर सर्व रोगग्रस्त अवशेष गोळा करून जाळून नष्ट करावे. बहराचे पाणी देण्यापूर्वी किंवा पावसाळ्यापूर्वी पाणी देण्यासाठी झाडांभोवती वाफे करून सेंद्रीय व रासायनिक खताचा हप्ता द्यावा. त्यामुळे रोग किडीविरुद्ध झाडाची प्रतिकारशक्ती वाढते. फळे सुपारीच्या आकारापेक्षा मोठी झालेली असल्यास १ टक्का बोर्डो मिश्रणाच्या (१ किलो चुना अधिक १ किलो मोरचूद प्रति १०० लिटर पाणी) किंवा मॅन्कोझेब २० ग्रॅम अधिक कार्बेन्डाझिम १० ग्रॅम (टँक मिक्स) प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने आवश्यकतेनुसार २ ते ३ फवारण्या घ्याव्यात.

# अभ्यासाच्या जोरावर आपले नावलौकिक करा -मेश्राम

## महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



बीड । प्रतिनिधी

येथील देवगिरी प्रतिष्ठान आयोजित साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे राज्यस्तरीय शालेय, महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २०२४ तुलसी संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे दि.११ ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यास्पर्धेचे हे पंधरावे वर्ष होते. वक्तृत्व स्पर्धेचे उदघाटन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त बीड श्रीमती श्रावस्ती मेश्राम यांच्या हस्ते करण्यात झाले. यावेळी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, प्रमुख अतिथी प्रो.डॉ. उत्तम साळवे, प्रा.डॉ.धम्मपाल घुबरे, तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.एल.एम.थोरात, उपप्राचार्य डी.जी.निकाळजे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना बीड येथील समाज कल्याण सहाय्यक आयुक्त श्रीमती श्रावस्ती मेश्राम म्हणाल्या की, स्पर्धेच्या युगात अभ्यास करणे खूप महत्त्वाचे आहे. वक्तृत्व स्पर्धेसह तुम्ही विविध क्षेत्रात अभ्यासाच्या जोरावर आपले नावलौकिक करा असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांनी फुले-शाहू-आंबेडकर-अण्णाभाऊ साठे यांच्यासह सर्व महापुरुषांच्या विचारांची पेरणी विद्यार्थ्यांमध्ये व्हावी यासाठी देवगिरी प्रतिष्ठान प्रयत्नशील असल्याचे सांगितले. या स्पर्धेच्या वरिष्ठ गट पदवी, पदव्युत्तरसाठी परीक्षक म्हणून डॉ.पांडुरंग सुतार, प्रा.शरद सदाफुले, सुनील बळवंते यांनी काम पाहिले. तर कनिष्ठ गट आठवी ते बारावीसाठी धर्मराज करपे, भीमराव पायाळ, प्रा.डॉ. चंद्रकांत साळवे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून कनिष्ठ गट आणि वरिष्ठ गटासाठी एकूण ६१ विद्यार्थी, विद्यार्थिनींनी यांनी सहभाग नोंदविला.

यामध्ये वरिष्ठ गटामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रोख रक्कम ७ हजार रुपये, स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र न्यू आर्ट्स कॉमर्स कॉलेज अहमदनगर येथील विद्यार्थी महेश जनार्दन उशीर याने पटकाविले, द्वितीय पारितोषिक रोख रक्कम ५ हजार रुपये,स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र बलभीम महाविद्यालय बीड येथील रोहन नामदेव चव्हाण याला मिळाले. तृतीय पारितोषिक रोख रक्कम ३ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र अहमदनगर होमिओपॅथिक कॉलेजची विद्यार्थिनी अक्षता वडवणीकर हिने आहे.

कनिष्ठ गटामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रोख रक्कम ५ हजार रुपये, स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र बार्शी येथील प्रणाली शहाजी धस हिने पटकाविले.द्वितीय पारितोषिक रोख रक्कम ३ हजार रुपये,स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र संगमनेर येथील गार्गी चंद्रकांत घुले हिने पटकाविले तर तृतीय पारितोषिक रोख रक्कम २ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र बीड येथील राजनंदिनी बप्पासाहेब डावकर हिने पटकाविले आहे. उत्तेजनार्थ वरिष्ठ गट आणि कनिष्ठ गटातील प्रत्येकी तिघांना प्रत्येकी १ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात आले.

वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण इंजि. दिपंकर रोडे, प्रो.डॉ.उत्तम साळवे, प्रा.डॉ.धम्मपाल घुबरे, प्रा.डॉ. पांडुरंग सुतार,प्रा. शरद सदाफुले, धर्मराज करपे, तुलसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.एम.थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डी.जी.निकाळजे यांनी केले कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा.डी.जी. निकाळजे यांनी साहित्यसम्राट डॉ.अण्णाभाऊ साठे राज्यस्तरीय शालेय, महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा घेण्यामागील उद्देश स्पष्ट केला तसेच संस्थेच्या विविध उपक्रमाविषयी सविस्तरपणे माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. या कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राचे सूत्रसंचालन प्रा.किशोर वाघमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा डॉ.योगिता लांडगे यांनी मानले तर दुसऱ्या सत्राचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. विकास वाघमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.किशोर वाघमारे यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## कंकालेश्वर शिवालयात भाविकांच्या रांगा




बीड । प्रतिनिधी

दुसऱ्या श्रावणी सोमवार निमित्त बीड शहरातील सर्वात पुरातन कंकालेश्वर शिवालय मंदिरात भाविकांनी पहाटेपासूनच रांगा लावल्या. हजारो भाविकांनी शिवालयात जाऊन शंकराचे दर्शन घेतले. श्रावणी सोमवार निमित्त बीड शहरातील अत्यंत पुरातन आणि हेमाडपंथी मंदिरात कंकालेश्वर शिवालय स्थित आहे.

या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे या मंदिराच्या सर्व बाजूंनी पाण्याचा कुंड असून मध्यभागी मंदिर आहे. मंदिरात जाण्यासाठी दगडी पूल तयार केलेला आहे .या पुलावरून मंदिरात जावे लागते .श्रावण सोमवार निमित्त सकाळपासूनच या मंदिरात दुग्धाभिषेक ,पूजा, आरती आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या ठिकाणी बीड शहरातील भाविकांनी तसेच परिसरातील भाविकांनी रांगा लावल्या होत्या. दिवसभर या मंदिरात गर्दी होती याच ठिकाणी विविध सामाजिक संघटनेच्या वतीने रक्तदान शिबिर फळ वाटप फराळाचे वाटप अधिक कार्यक्रम आयोजित केले होते. महिलांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता रात्री उशिरापर्यंत भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

## तर एकाही राजकीय पक्षाला धनगर समाज मतदान करणार नाहीत

बीड । प्रतिनिधी

भारतीय संविधानाने धनगर समाजाला दिलेल्या अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाची राज्य सरकारने त्वरित अंमलबजावणी करावी, अन्यथा संभाजीनगर येथे जगातील सर्वात मोठे आमरण उपोषण करण्यात येईल. यामध्ये ५०० तरुण आमरण उपोषण करतील. एसटी आरक्षणासंदर्भात राज्यातील प्रमुख पक्षांनी आपली भूमिका स्पष्ट करावी. एसटी आरक्षणाच्या बाजूने भूमिका घेतली नाही, तर येत्या निवडणुकांत धनगर समाज एकाही पक्षाला मतदान करणार नाही, अशी ठोस भूमिका सकल धनगर समाजाच्या वतीने घेण्यात आली.

सकल धनगर समाजाच्या वतीने गंज पेठेतील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक येथे आयोजित राज्यस्तरीय अधिवेशनात विविध विषयांवर चर्चा होऊन ठराव पारित करण्यात आले. धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाची अंमलबजावणी, राजकीय भूमिका, आरक्षणासाठीचा न्यायालयीन व रस्त्यावरील लढा, आगामी निवडणुकीच्या संदभार्ने धनगर समाजाची भूमिका ठरवण्यासाठी धनगर समाजातील सुशिक्षित तरुण अभ्यासक, उपोषणकर्ते, कार्यकर्ते एकवटले होते. धनगरांना एसटी आरक्षण, विधानसभा निवडणुकीत योग्य प्रतिनिधित्व, धनगरांचे एकीकरण, कलम ३४२ (१) नुसार राज्यपालांनी धनगड ऐवजी धनगर अशी दुरुस्तीची शिफारस राष्ट्रपतींकडे पाठवावी, डॉ. सुधाकर शिंदे समितीचा अहवाल सादर करावा आदी ठराव करण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्रातील धनगर बहुल मतदारसंघातून यशवंत संदेश यात्रा काढण्याचा निर्णय झाला असून, विरोधी भूमिका घेणाऱ्यांना पाडण्यात येणार असल्याचा निर्णय झाल्याचे अधिवेशनात स्पष्ट करण्यात आले.




### सामाजिक प्रश्नासाठी समाजाशी आमची नाळ जुळलेली आहे- वाकसे

गेल्या पंधरा वर्षापासून धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाच्या प्रश्नासाठी सतत आम्ही कार्यरत असून आमची नाळ ही धनगर समाजाच्या सामाजिक प्रश्नांसाठी व प्रश्न सोडवण्यासाठी जुळलेली आहे सामाजिक परिस्थिती पाहता प्रश्न सुटले पाहिजे यासाठी समाजाच्या हितासाठी सतत आम्ही कार्यरत असतो सामाजिक समतोल ठेवून आम्ही समाजाच्या विविध प्रश्नांसाठी कायम संघर्ष करत राहतो असे धनगर समाजाच्या पुणे येथील अधिवेशनादरम्यान शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी म्हटले आहे

## श्रावण सोमवार निमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर-जयश्री विधाते



बीड । प्रतिनिधी

आज श्रावण सोमवार निमित्त श्री क्षेत्र कंन्कालेश्लर मंदीर परिसरात आलेल्या भाविक भक्तांचे जयदत्तजी आण्णा क्षीरसागर सामाजिक विचारमंच महीला आघाडी बीड विधानसभा प्रमुख जयश्री विलास विधाते यांच्या सहकार्याने सोनाजी राव क्षीरसागर होमिपॅथीक मेडीकल कॉलेज बीड डॉ. अरुण भस्मे , डॉ.महेंद्र गौशाल, डॉ. गणेश पांगारकर, डॉ. अंजली पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अंजली क्षीरसागर, डॉ. अमृता आगवान, डॉ. अनिल राठोड, डॉ. विशेष सरनाईक , डॉ. दिक्षीता घोरपडे, डॉ. संयुक्ता काळे यांच्या टीमने मोफत आरोग्य तपासणी आणि औषध वाटप करण्यात आले यावेळी महीला आघाडीच्या वतीने प्रसाद वाटप करून शुभेच्छा दिल्या. या उपक्रमात नगरसेविका सुशिलाताई नाईकवाडे, भारतीताई क्षीरसागर, यांच्यासह मुख्याध्यापक किर्तीताई पांगारकर प्रा संगीताताई शिंदे आणि सर्व महीला आघाडी सदस्याचे सहकार्य लाभले.

## ऑल इंडिया पँथरसेनेची आंबेजोगाई शासकीय विश्रामगृह येथे बैठक

पाटोदा । प्रतिनिधी


दि ११/०८/२०२४ रोजी शासकिय विश्रामगृह अंबाजोगाई येथे ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने प्रवेश सोहळा तसेच पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम पार पडला या कार्यक्रमाला महराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष अशोक घडवे पाटील, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणिस, जीवन गायकवाड , मराठवाडा युवक अध्यक्ष अक्षयभैय्या भुंबे , बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, महीला आघाडी ग्रामीण जिल्हाध्यक्ष मिनाताई लोंढे, बीड जिल्हा सरचिटणिस विजयबाबा कांबळे, जिल्हा सचिव वसीमभाई शेख, जिल्हा संघटक सुशिल गायकवाड, अंबाजोगाई तालुका अध्यक्ष बादल तरकसे, उपस्थित होते.

या बैठकीत बीड जिल्हा युवक अध्यक्ष पदी नितीन गोदाम यांची निवड करण्यात आली , केज तालुका अध्यक्ष पदी समाधान बचूटे , बीड जिल्हा आयटी अध्यक्ष पदी प्रतिक वाघमारे, केज तालुका युवक अध्यक्ष पदी राजकुमार धिवार, अंबाजोगाई तालुका युवक अध्यक्ष पदी शैलेंद्र बनसोडे, बीड जिल्हा युवक उपाध्यक्ष पदी विश्वास भालेराव, परळी तालुका उपाध्यक्ष पदी कमलाकर घाडगे, अंबाजोगाई युवक ता. उपाध्यक्ष पदी अक्षयभैय्या कसबे, अंबाजोगाई तालुका युवा उपाध्यक्ष पदी गफार खुरेशी, सुरज नाईकवाडे अंबाजोगाई तालुका संघटक , अंबाजोगाई ता.युवक उपाध्यक्ष पदी शुभम मस्के , ॲटो युनियन शहराध्यक्ष पदी सुनिल खैरमोडे यांची निवड करण्यात आली



या बैठकीला ऑल इंडिया पँथर सेना बीड जिल्ह्यातील पदाधिकारी कार्यकर्ते महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तालुका अध्यक्ष बादल तरकसे व त्यांच्या तालुक्यातील सर्व कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी यशस्वी त्या कार्यक्रम पार पाडला. त्याबद्दल जिल्हाध्यक्ष नात्याने सर्वांचा आभारी आहे व नवीन पदाधिकाऱ्यांना संघटनेच्या वतीने शुभेच्छा देऊन आपल्या दिलेल्या पदाला न्याय द्यायला ही अपेक्षा बाळगतो..नितीन सोनवणे

## राजाभाऊ खरबड याची पर्यवेक्षकपदी नियुक्ती



युसूफवडगांव। प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील माध्यमिक व उच्च माध्य.विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक मा.राजाभाऊ खरबड यांची विद्यालयाच्या पर्यवेक्षक पदी पदोन्नती झाल्याबद्दल युसूफवडगांव ग्रामपंचायतच्या वतीने त्यांचा विद्यालयामध्ये सत्कार करण्यात आला.

भालचंद्र शिक्षण संस्था संचलित युसूफवडगांव येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय युसूफवडगांवचे पर्यवेक्षक हे नुकतेच सेवानिवृत्त झाले होते.त्यामुळे पर्यवेक्षक पदी हे रिक्त असल्याने त्या जागी सेवा जेष्ठतेनुसार संस्थेचे सचिव दिपकदादा घुमरे यांनी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक राजाभाऊ खरबड यांची नियुक्ती केली आहे.त्याबद्दल त्यांचा युसूफवडगांव ग्रामपंचायत कार्यालयाच्यावतीने विद्यालयामध्ये जाऊन शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व फेटा बांधून सत्कार करण्यात आला यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक अंकुश भोसले,उपसरपंच महेश लामतुरे,चंद्रकांत भुसारी,मन्मथ पाटील,अरूण राऊत,अशोक चोपणे,राजु गायके,काशीनाथ खरबड,सुर्यकांत थळकरी,पत्रकार सचिन उजगरे सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

# बीडमध्ये मराठवाडा स्तरीय इनाम जमीन हक्क परिषदेचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

१० ऑगस्ट २०२४ शासकीय विश्रामगृह बीड येथे मराठवाड्यातील गोसावी गुरव व इतर समाजातील इनामदारकांच्या बैठकीचे आयोजन इनाम हक्क परिषदेचे मराठवाडा संयोजक ओम प्रकाश गिरी दत्ता महाराज गिरी व राजेंद्र बन यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते. इनामदारकांच्या हक्कासाठी ओमप्रकाश गिरी यांचे नेतृत्वात मराठवाडा स्तरीय इनाम हक्क परिषदेची स्थापना करण्यात आली. इनाम हक्क परिषदेत सर्वानुमते - मराठवाड्यातील स्वांतंत्र्यपूर्व काळातील देवस्थान इनामी जमिनी खालसा करणे वा वर्ग १ मध्ये रूपांतरित करावे - यासाठी यासाठी एकमताने ठराव मांडण्यात आला.




स्वांतंत्र्यपूर्व काळात साधारण इ.स. १८०० ते १९३० या कालावधीत तत्कालीन अस्तिवात असलेल्या राजे महाराजे आणि त्यांच्या राजवटीने अल्पसंख्याक असलेल्या मुख्यःते गोसावी, गुरव ब्राह्मण व अन्य जातीतील लोकांना देवस्थानच्या देखभालीसाठी, पुजाअर्चा आणि उत्सवसाठी तसेच वैयक्तिक कुंटूबांच्या उदरनिर्वाहा साठी सेवा मोबदला म्हणून निरंतर स्वरुपात बक्षीसपत्रा / सनद्वारे जमिनी बहाल केलेल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात एकूण सात इनाम जमिन प्रकार अस्तिवात होती. त्यापैकी चार इनाम प्रकार १९६० पूर्वी तत्कालीन शासनाने खालसा रददाबद्दल केली आहेत. देवस्थान इनामी जमिनी ह्या खिदमत / मदतमास म्हणून ओळखल्या जातात. अश्या देवस्थान इनामी जमी जमिनीचे महाराष्ट्र राज्यातील क्षेत्र अंदाजे ३० ४० हजार हेक्टर आजही अस्तिवात आहे. या जमिनी गावातल्या मुख्य देवस्थानच्या दैनंदिन पुजा, अर्चा देखभालीसाठी, उत्सवसाठी आणि पुजारी/आर्चक कुंटूबांचा उदरनिर्वाह चालवा यासाठी निरंतर कायम स्वरूपी बहाल केलेल्या आहेत. परंतू खालील कारणामुळे सद्यपरिस्थिती मुळे सध्याच्या काळात इनामधारक हा मुळाउदेशापासून वंचित राहिलेला आहे. आणि कुंटूबांच्या उद्दरनिविदासाठी तसेच देवस्थानच्या दैनंदिन पुजा, अर्चा, उत्सवसाठी देखभालीसाठी असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. इनामी जमिणी कोरडवाहू आहेत. बदलत्या हवामानामुळे अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. देवस्थान इनामी जमिनीना कोणत्याही प्रकारच्या शासकीय योजनाचा लाभ मिळत नसल्याने इच्छा असूनही ह्या जमिनी विकसित करता आल्या नाही. उदा- पकविमा योजना, पिक कर्ज योजना, जलसंधारण तसेच कूपनलिकासाठी अनुदान व कर्ज योजना इ. मागील २०० - २५० वर्षामध्ये वंश / कुंटूब विस्तारामुळे जमिनीची विभागणी होवून आज रोजी सदर वहिवाटदार अल्पभूधारक झाले आहेत, त्यामुळे देवस्थाच्या खर्च व स्वतच्या कुटुंबाचा उदरनिर्वाहासाठी गावं सोडणे भाग पडते आहे.सद्यपरिस्थिती प्रत्येक गावात फक्त १/२ ब्राम्हण कुटुंब राहिलेली आहेत. त्यांना पुजा अर्चा करण्यास जाणूनबुजून अडथळा निर्माण करणे, सहकार्य नसल्याने अशा कुटुंबाना गावं सोडून जाने भाग पडले आहे. काही समाजकंटकाडून खोट्या केसस दाखल करणे, शेती कसण्यास प्रतीबंध करणे, शासकीय कागद पत्रामध्ये फेरफार खाडाखोड करून बेकादेशीरित्या जमिनीवर कब्जा करणे, च) वारसनोंदी / विरासत कार्यवाही करण्यामध्ये हस्तक्षेप करणे.सदय परिस्थितीत महाराष्ट्र राज्यात अशी बरेच प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. त्यांचा वर्षांनुवर्ष निकाल लागत नाही. त्यामुळे प्रचंड मानसिक शारीरिक व आर्थिक नुकसानास तोंड द्यावे लागत आहे.काही प्रकरणामध्ये न्यायालयाचा निकाल लागून सुद्धा इनामधारकांना प्रत्यक्ष ताबा मिळेलेला नाही.मूळहक्कातील नावे काढून इतर हक्कात टाकण्यात आलेली आहेत.इनामी जमिनीपैकी काही क्षेत्र हे नगरपालिका । महानगरपालिका हद्दीत गावाचा विस्तार झाल्यामुळे आलेले आहे. अश्या जमिनीवर शेतीपण करता येत नाही. तसेच विकसित पण करता येत नाही. परिणामी स्थानिक समाजकंटक, भूमाफिया अश्या जमिनीवर बेकायदेशीररीत्या कब्जा करतात. व गैरमार्गाने विक्री करतात व मुळ इनामधारकांना न्यायालयीन आणि पोलीस प्रकरणात अडकवून त्यांना मूलभूत हक्कापसून वंचित ठेवतात. वरील सर्व परिस्थीतीच्या गांभिर्याने विचार करून देवस्थानच्या विकासासाठी तसेच इनाम धारकांचे मुलभूत हक्क निरंतर अबाधित राहण्यासाठी शासकीय कायद्यामध्ये तरतूद करावी अशी सर्व इनामधारक व परशुराम संघ यांच्या वतीने खालील मागण्याचे निवेदन सादर करत आहोत. इतर जमिनी प्रमाणे सर्व शासकीय योजनाचा लाभ मिळवा.देवस्थान इनाम जमिनी वर्ग १ मध्ये रुपांतरीत करण्यात.आर्चक व त्यांचे वंशज यांना पूर्वी प्रमाणे पुजा अर्चा उत्सव साजरे करण्यात, तसेच जमिनी विकसित / विक्री करण्याची कायद्यात तरतूद करावी. न्यायालयीन प्रकिया जलदगतीने निकाली निघण्याची कायद्यात तरतूद करणे.वारसनोंद विरासत कार्यवाही साठी शासकीय यंत्रणाचे सहकार्य मिळावे.देवस्थान इनाम जमिनी, व देवस्थानच्या विकासासाठी व आर्थिकसाहह्यासाठी राज्यस्तरिय महामंडळ स्थापन करावे अशा मागण्या इनामदार यांच्यावतीने करण्यात आल्या व यासाठी राज्यस्तरावर संघटन मजबूत करून माननीय मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री महसूल मंत्री यांच्यासोबत चर्चा करण्याचे ठरले इनाम हक्क परिषदेचे यशस्वीतेसाठी विश्वंभर गिरी प्रसिद्धीप्रमुख रवी बन बाजीराव गिरी सिद्धेश्वर गिरी विवेकानंद गिरी सचिन गिरी महेश गिरी यांनी परिश्रम घेतले.

# लवुळ ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या अंडरग्राउंड नाली व स्मशानभूमी कामाची चौकशी करा

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील लवुळ क्रमांक १ येथील ग्रामपंचायती मार्फत सन, २०२२ – २३ या वर्षातील १५ व्या वित्तआयोगा अंतर्गत नाली व स्मशानभूमी बांधकामाची चौकशी करावी अशी मागणी नवतरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष सुग्रीव शिंगाडे स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे बी.जी.शिंदे सह डी.के. मोरे , विठ्ठल राठोड, शाहबाज शेख व विनोद राठोड यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

लवुळ येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्टेट बँक ऑफ इंडिया पर्यंत अंडरग्राउंड नालीचे बांधकाम केले असुन हे बांधकाम बोगस व अत्यांत निकृष्ट दर्जाचे करण्यात आलेले आहे. कसल्याही प्रकारचे खोदकाम न करता जमिनीवरच नाल्या टाकण्यात आल्या असून वर – वर केवळ माती टाकून संबंधित गुत्तेदाराने बोगस काम केले आहे. संबंधित नाल्याचे काम करण्यासाठी बांधकाम करताना पाणीपुरवठा फिल्टर व टाकीसाठी बांधण्यात आलेल्या कंपाऊंडचे वॉल पाडून हे काम करण्यात आले आहे. त्याामुळे पाणीपुरवठा व ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच नाली बांधकाम जमिनीवर झाल्याने पाणीपुरवठा फिल्टर व टाकीकडे जाणारा रस्ता बंद झाला आहे. पाणीपुरवठा फिल्टर दुरुस्ती किंवा रोहित्र विद्युत जळाल्यानंतर त्याासाठी यापुढे त्याा परिसरात वाहन जाणार नाही. त्याामुळे गावाच्या पाणीपुरवठा योजना व इतर गंभीर समस्या भावी काळात निर्माण होऊ शकतात. ग्रामपंचायतीने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. नाली बांधकाम जमिनीवरच झाल्यामुळे रोड, नाली व ओपन प्लेस नालीच्या दोन्ही बाजूने ३ ते ४ फुट खोलीचे खड्डेच खड्डे तयार झाले आहे. पातुड शिवारातून येणारे पाणी, रोडवरील, पाणीपुरवठा टाकीच्या ओपन स्पेस मधील, सेवा सहकारी सोसायटी परिसरातील पाणी व साखर कारखाना ऑफिस परिसरातील नालीच्या दोन्ही बाजूने पाणी साचत असल्यामुळे या बाजूला तरुण मुलांना व्यायाम करण्यासाठी काही साहित्या उभारलेले आहे परंतु येथील ग्रामपंचायतीच्या निष्क्रीय धोरणामुळे जिम धोक्यात आलेली आहे. या परिसरात अति प्रमाणात पाणीच पाणी साचल्यामुळे दुर्गंधी पसरली आहे. तसेच स्मशानभूमी

सुशोभीकरणाचे काम इस्टिमेट प्रमाणे सोलिंग, व वॉटरप्रूफ सिमेंट न वापरता थातूरमातूर व अत्यांत निकृष्ठ दर्जाचे काम करण्यात आलेले आहे. या ठिकाणी बसविण्यात आलेले पेव्हर ब्लॉक वरून सरपन घेऊन जाणारे वाहन सुद्धा जाऊ शकत नाही. अशा प्रकारचे बोगस काम या दोन्ही पान ३ वर


ग्रामस्थांची गटविकास अधिकाऱ्याकडे निवेदनाव्दारे मागणी

# कुकडी प्रकल्पाचे ओव्हर फ्लोचे पाणी सीना व मेहकरी धरणात सोडा

## सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांची जिल्हाधिकारी व मुख्य अभियंता यांना निवेदनाद्वारे मागणी

आष्टी । प्रतिनिधी

पावसाळा सुरू होऊन अडीच महिने लोटले तरी आष्टी तालुक्यामध्ये दमदार असा पाऊस झालेला नाही. त्याामुळे तालुक्यात काही गावात पाण्याची गंभीर समस्या भेडसावत आहे. तालुक्यातील निंबोडी तलाव वगळता एकही तलाव भरलेला नाही. त्याामुळे कुकडी प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या दमदार पावसामुळे ८० टक्के अधिक क्षमतेने सर्व धरणे भरलेले आहेत. कुकडीचे अतिरिक्त पाणी भीमा खोऱ्यातील श्रीगोंदा कर्जत व करमाळा तालुक्यातील सर्व तलाव व नदीच्या पात्रात सोडून बंधारे भरून घेतली जात आहेत. आष्टी तालुक्यातील पश्चिम बाजूच्या गावांना व परिसरात समाधानकारक पाऊस नसल्यामुळे या भागातील तलाव नदी अद्याप कोरडेठाक पडले असून या परिसरातील विहिरींची व कुंपणलिकेच्या पाण्याची पातळी खालावली आहे. पावसाळा सुरू होऊन अडीच महिने झाले तरी नदीचे पात्र व बंधारे कोरडेठाक आहेत. त्याामुळे कुकडीचे प्रकल्पाचे ओव्हर फ्लो चे पाणी भोसा खिंड मार्गे सीना धरणातून मेहेकरी धरणात सोडण्यात यावे. यामुळे मेहेकरी, आनंदवाडी, सराटेवडगाव, टाकळी रुई, शिराळ, फत्तेवडगाव, वाकी, दैठणा, चिखली, हिंगणी, टाकळसिंग, सांगवी आष्टी, खडकत यासह परिसरातील गावांना फायदा होणार आहे. त्याामुळे तात्काळ कुकडे प्रकल्पाचे ओव्हर फ्लो चे पाणी तात्काळ मेहेकरी धरणात सोडावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे आष्टी विधानसभा अध्यक्ष (शरदचंद्रजी पवार गट) राम खाडे यांनी बीडचे जिल्हाधिकारी व छत्रपती संभाजीनगर चे (पाटबंधारे विभाग) मुख्य अभियंता यांना सोमवार दि.१२ ऑगस्ट रोजी निवेदनाद्वारे केली आहे.



# निष्क्रिय पोलीस प्रशासनामुळे वेश्या व्यवसायाचा सूळसुळाट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहर हे संस्कृतीक शहर मानले जातेय मात्र या ठिकाणी काही महिन्यापासून वैश्या व्यवसाय फोफावत जात आहे निष्क्रिय पोलीस प्रशासन यास प्रामुख्याने जबाबदार आहे नागरिकांनी माहिती देवून सुद्धा पोलीस याकडे दुर्लक्ष करत हा व्यवसाय करणार्यांना बढावा देत आहेत असा प्रश्न उपस्थित होतोय.

शहरानजिक प्लॉटटींग मधील एका पत्र्याच्या शेड मध्ये वैश्या व्यवसाय पोलिसांच्या नाकावर टिच्चून चालू आहे या ठिकाणी रात्री अल्पवयीन मुली आल्याचे अनेकांच्या निदर्शनास आले आहे कला केंद्र सारखा रात्रभर अनधिकृत नाच गाना चालू आहे याशिवाय या रस्त्याावरून जाणाऱ्यांना आडवा आडवी करत लुटण्याचे प्रकार घडले आहेत त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांना जीव मुठीत धरून जावे लागत आहे. पोलीस प्रशासनाच्या अधिकारी यांना कल्पना देवूनही सदरील व्यवसाय बंद होत नसल्याने नागरिकांनी बीड जिल्ह्याचे नवनियुक्त शिस्तप्रिय पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ साहेब यांच्याकडे दाद मागणार आहेत.

यापूर्वी दोन महिन्यापूर्वी शहरातील पिताजी सारडा नगरी येथील रोहाऊस मध्ये देहविक्री चा व्यवसाय चालू होता हे निदर्शनास आल्यास येथील सोसायटीचे अध्यक्ष, सचिव व नागरिकांनी एकत्रा येत याचा परदाफाश केला.पोलीस प्रशासनास रीतसर अर्जही केला मात्र कारवाई न झाल्याने नागरिकांनी सदरील घरमालकास बोलवत खडसावल्याने सदरील वैश्या देहविक्री व्यवसाय बंद झाला.हा व्यवसाय मोठ्याप्रमाणात वाढत असताना पोलीस प्रशासन गप्प असल्यामुळे संशयाची सुई गवगवते. मात्र बीड जिल्ह्याला शिस्तप्रिय पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ साहेब यांची नियुक्ती झाल्याने अगामी काळात अश्या अवैध धंद्याना आळा बसेल अशी अपेक्षा आहे.

# माजलगाव नगरपरिषद कार्यालयात भरवणार भाजीपाला मार्केट व आठवडी बाजार – कोरडे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील नगरपरिषद कार्यालयात दि १४ ऑगस्ट रोजी भाजी पाला मार्केट व आठवडी बाजार भरवणारी असल्याची माहिती श्रीराम कोरडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

यासंदर्भात प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की,माजलगाव शहरातील दर बुधवारी व रविवारी आठवडी बाजार,भाजी पाला मार्केट,रोजचे बीट यासाठी शासनाने कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देण्यात यावी व मार्केट बांधून देण्यात यावे.या मागणीसाठी माजलगाव नगर परिषद या ठिकाणी बुधवा दिनांक ऑगस्ट बुधवार रोजी या दिवशी बाजार भरविण्यात येणार आहे आमची मागणी आहे की माजलगावातील शेतकऱ्यांसाठी नगरपरिषद यांनी जागा उपलब्ध करून त्याामध्ये सर्व सुविधा नियुक्त असे मार्केट बांधून शेतकऱ्यांच्या भाजीपाला विकण्याची सोय करावी अन्यथा आम्ही सर्व शेतकरी येणाऱ्या दि १४ ऑगस्ट बुधवारी नगरपरिषद माजलगाव या ठिकाणी आम्ही सर्व बाजार भरवण्यात आहेत.तरी सर्व शेतकऱ्यांनी व भाजीविक्रेते व इतर व्यापारी यांनी या आंदोलनामध्ये सहभागी व्हावे तसेच या आंदोलनामध्ये सहभागी नाही होणाऱ्या शेतकऱ्या व व्यापाऱ्याला मार्केटमध्ये बसू दिले जाणार नाही व त्याा शेतकऱ्याकडून किंवा भाजी विक्रेत्याा व्यापारीकडून मोठ्या प्रमाणात दंड वसूल केला जाईल तसेच त्याला कायद्याप्रमाणे जबाब विचारला जाईल तरी मोठ्या संख्येने आंदोलन सहभागी व्हावी असे आवाहन कोरडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# शेकापच्या मध्यवर्ती समितीवर भाई राजु शेख, ॲड.भाई राजेंद्र नवले

बीड । प्रतिनिधी

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे १९ वे अधिवेशन पंढरपुर येथे भाई गणपतराव देशमुख नगरीमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.या अधिवेशनामध्ये शेतकरी, कामगार, कष्टकरी, दिन-दलीत यांच्या प्रश्नावर सातत्याने विद्यार्थीदशेपासून आंदोलन करणारे व चळवळीत सहभागी असणारे निष्ठावंत कार्यकर्ते भाई राजु शेख आणि ॲड.राजेंद्र नवले यांची मध्यवर्ती समितीवर सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

याबाबत वृत्त असे की शेकाप पक्षाचे अधिवेशन यापर्षी पंढरपुर येथे संपन्न झाले यावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्राच्या मध्यवर्ती समितीवर भाई राजु शेख आणि ॲड.राजेंद्र नवले निवड झाली. भाई राजु शेख आणि ॲड.राजेंद्र नवले आजतागायत लाल बावट्याच्या झेंड्याखाली आजतागायत एकनिष्ठतेने काम केले आहे भाई राजु शेख आणि ॲड.राजेंद्र नवले म्हणून त्याांची फेरनिवड झाली आहे. सर्वसमावेशक नेतृत्व म्हणून त्याांनी काम केले आहे. भाई राजु शेख यांची नवीन नियुक्ती करण्यात आली आहे व ॲड.भाई राजेंद्र नवले यांची फेरनिवड करण्यात आली आहे त्याबद्दल त्याांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.





# प्रदेशाध्यक्ष नाना पटोले-प्रा.ईश्वर मुंडे यांची भेट

## माजलगाव मतदार संघ निवडणूकीबाबत चर्चा

किल्ले धारूर । प्रतिनिधी

राज्यात विधानसभा निवडणूकीचे वारे वाहात आहेत.नेते व कार्यकर्त्यांच्या भेटी,मेळावे व संवाद यात्रांना वेग आलेला आहे.

महा विकास आघाडीचा प्रमुख पक्ष राष्ट्रीय काँग्रेस चे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख व माजलगाव विधानसभा मतदार संघात निवडणूक लढवण्यास ईच्छूक उमेदवार प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांची भेट झालेली असून त्यांनी आगामी माजलगाव विधानसभा निवडणूकीबाबत सविस्तर चर्चा केली.

माजलगाव विधान सभा मतदार संघात महा विकास अघाडीत मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षा कडून निवडणूक लढवण्यास ईच्छूक आहे.खा.शरदचंद्र पवार साहेब व प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील यांना प्रत्याक्ष भेटून तिकिटाची मागणी केलेली आहे. पक्षाने संधी दिल्यास आपण माजलगाव विधानसभेची निवडणूक लढवणार आहोत करीता आपल्या पक्षाचे सहकार्य असावे अशी विनंती केल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.



# हद्दपार आरोपीस पाटोदा पोलिसांनी घेतले शिताफीने ताब्यात



पाटोदा । प्रतिनिधी

आज दिनांक १२.०८.२०२४ रोजी ११.०० वाजता सहा पोलीस निरीक्षक श्री अनमोल केदार यांना गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की , बीड जिल्हयातुन तडीपार ईसम नामे निलेश उत्तम अडागळे रा. महासांगवी ता पाटोदा जि. बीड हा राजमहंमद चौक पाटोदा येथे येणार आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने स पो नि केदार यांनी सदरची माहिती पोह/१२४० संतोष काकडे, पोना/१८१३ उद्धव गडकर, पोशि/४७२ रियाज पठाण ,पो शि/१८७४ संजय पवार यांना समक्ष दालनात बोलावून सदरची माहिती सांगितली , त्याावर लागलीच नमुद पोलीस पथक खाजगी गणवेशात राजमहंमद चौकातील तारा पान सेंटर येथे सापळा लाऊन थांबले असता, हद्दपार ईसम नामे निलेश उत्तम अडागळे रा. महासांगवी ता पाटोदा जि. बीड हा वेशभूषा बदलून सहज रित्याा ओळखु येणार नाही अशा रीतीने तेथे आला असता पोलीस पथकाने त्यास शिताफीने ताब्यात घेतले. त्याा ईसमाविरुध्द पोलीस ठाणे पाटोदा येथे गुरन ११२/२०२१ कलम ३९४,५०४,५०६ भादंवि, गुरन ५२/२०२३ कलम ३९४,४२७,५०४,३४ भादंवि प्रमाणे गुन्हे दाखल असल्याने त्यास मा. उपविभागीय अधिकारी पाटोदा यांचे आदेश जा.क्र.२०२३/एम एजी/हद्दपार/सीआर/-०२ २३३८ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, पाटोदा दिनांक २८/०३/२०२४ पान ३ वर

# सखाराम आंधळे यांचे निधन



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील तागडखेल गावचे सखाराम दगडू आंधळे (गुरुजी) यांचे दि.८जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पाश्चात्या त्यांची पती केराबाई आंधळे व दोन मुले सुना नातवंडे असा परिवार आहे.

# वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळा - दिपाली जाधव

## ५१ विद्यार्थिनींना रोटरी क्लबच्या वतीने सायकलचे वाटप

अंबाजोगाई । प्रतिनिधी

वाहन कोणतेही असेल तरी,ते चालवताना वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळा. असे आवाहन मोटार वाहन निरीक्षक दिपाली रविंद्र जाधव यांनी केले.

येथील वेणूताई चव्हाण कन्या विद्यालय येथे रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने ग्लोबल ग्रँट अंतर्गत अंबाजोगाई तालुक्यातील गरजू ५१ शालेय विद्यार्थीनीना मोफत सायकल चे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून लातूर येथील मोटार वाहन निरीक्षक दिपाली जाधव बोलत होत्याा.यावेळी व्यासपीठावर वेणूताई चव्हाण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सतीश लोमटे,रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी,प्रोजेक्ट डायरेक्टर स्वप्नील परदेशी, को. डायरेक्टर गणेश राऊत यांची उपस्थिती होती.

यावेळी दिपाली जाधव यांनी लहान, मोठे अपघात टाळण्यासाठी काय काळजी घ्यावी. वाहन चालवताना कोणते नियम पाळावेत. तसेच मुलींनी सायकल चालवताना कशी दक्षता बाळगावी. याची अनेक उदाहरणे देत जनजागृती केली. यावेळी सतिष लोमटे यांनी आपल्या भाषणात रोटरीच्या कार्यासाठी गौरव केला. अध्यक्षीय समारोप कल्याण काळे यांनी केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरीचे सचिव धनराज सोळंकी यांनी केले. संचनल प्रा.संतोष मोहिते यांनी तर उपस्थितांचे आभार रूपेश रामावत यांनी मानले.




## जुन्या सायकली देण्याचे आवाहन

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना सायकल दिली जाते. ही सायकल जोपर्यंत गरज आहे. तोपर्यंत ती विद्यार्थी वापरतात. नंतर ती सायकल बँक मध्ये जमा होते. या सायकली पुन्हा नविन गरजु विद्यार्थ्यांना दिल्या जातात. ज्यांच्याकडे जुन्या सायकली पडुन आहेत. त्याा सायकली रोटरी क्लबला द्याव्यात रोटरी क्लब त्याा सायकली दुरूस्त करून गरजू विद्यार्थ्यांना दुरूस्त करून देईल व सायकल बँकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रश्न मार्गी लागतील. यासाठी जुन्या सायकली रोटरीकडे जमा कराव्यात. असे आवाहन रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिन धनराज सोळंकी यांनी केले आहे.

# दिवसा जबरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अटक

## ७ लाखाचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हयातील जबरी चोरी, घरफोडी गुन्हे उघडकीस करण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्याा. त्याा अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते.

दिनांक ११/०८/२०२४ रोजी देवमुतों ता. जि. जालना येथील फिर्यादी नामे विठ्ठल तुकाराम चव्हाण रा. देवमुती ता.जि.जालना यांचे घरी दिवसा जबरी चोरी झालेल्या प्रकरणात पोलीस ठाणे तालुका जालना गुरनं. ५१५/२०२४ कलम ३०९(४) भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल होऊन स्थानिक गुन्हे शाखेतील

पोलीस अधिकारी व अंमलदार हे सदर गुन्हयातील अज्ञात गुन्हेगारांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा आरोपी नामे १) अर्जुनसिंग छगनसिंग भोंड वय २४ वर्ष रा. गुरुगोविंदसिंग नगर, जालना व २) सागरसिंग फंट्यासिंग अंधरेले उर्फ बावरी वय २४ वर्ष रा. हरिगोविंद रेसीडेन्सी, सरस्वती मंदीरा जवळ जालना यांनी मिळून केला आहे. तसेच ते देऊळगावराजा कडे गेले आहेत. अशी माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी वेगवेगळे पथके तयार करुन वेगवेगळे ठिकाणी सापळा रचून आरोपीतांचा देऊळगावराजा, पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske (mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बारामतीत युगेंद्र पवारांची होणार एन्ट्री? जयंत पाटलांनी दिले संकेत

**बारामती । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघ मोठ्या प्रमाणात चर्चेत आला होता. कारण या ठिकाणी नणंद - भावजय यांच्यात लढत झाली होती. यामध्ये सुप्रिया सुळेंनी बाजी मारत बारामती लोकसभा जिंकली होती. यानंतर आता बारामती विधानसभेसाठी पुन्हा एकदा पवारांच्या कुटुंबातच सामना रंगणार असल्याचे दिसत आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी तसे जाहीर संकेत दिले आहेत. या विधानसभा निवडणुकीत युगेंद्र पवार हे अजित पवार यांना आव्हान देण्याची शक्यता आहे.



राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा सध्या राज्यात सुरू आहे. याच यात्रेचा भाग म्हणून बारामती इथं काल जाहीर सभा झाली. या सभेत बोलताना जयंत पाटील यांनी बारामती विधानसभा निवडणुकीच्या उमेदवारीवर अप्रत्यक्ष भाष्य केलं. बारामती विधानसभा निवडणूक युगेंद्र पवार हेच लढवतील असे संकेत त्यांनी यावेळी दिले. त्यांनी युगेंद्र पवारांचं कौतुक केलं. 'युगेंद्र पवार हे अलीकडं राजकारणात रस घेऊ लागले आहेत. पवार साहेबांच्या लोकसभेच्या प्रचारापासून ते आता सगळीकडं फिरू लागले आहेत. तरुण नेतृत्वाला कसा पाठिंबा मिळू शकतो हे युगेंद्रदादांच्या रुपानं आपण गावागावांत बघतो. ते जिथं-जिथं जातायत, तिथं कार्यकर्ते उत्साहानं पुढं येत आहेत. सार्वजनिक जीवनात युगेंद्रदादांनी लक्ष घालायला सुरुवात केल्यापासून कार्यकर्तेही त्यांना साथ देत आहेत. बारामती विधानसभेचं भविष्य नव्या रक्ताकडे, नव्या हातात देण्याची उत्सुकता सर्वांना दिसेतय. हे कामही सगळे कार्यकर्ते योग्य पद्धतीनं करतील, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

युगेंद्र पवार हे अजित पवार यांचे बंधू श्रीनिवास पवार यांचे चिरंजीव आहेत. शरद पवार यांनी स्थापन केलेल्या विद्या प्रतिष्ठान शिक्षण संस्थेचे ते खजिनदार आहेत. तसंच बारामती तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आहेत. बारामतीमधील सामाजिक कार्यात ते सक्रिय आहेत. अजित पवार यांनी शरद पवार यांच्या विरोधात राजकीय भूमिका घेतल्यानंतर श्रीनिवास पवार आणि युगेंद्र पवार हे मोठ्या पवारांसोबत राहिले आहेत. लोकसभा निवडणुकीत युगेंद्र यांनी सुप्रिया सुळे यांचा जोरदार प्रचार केला होता. या निवडणुकीत बारामती विधानसभेत सुप्रिया सुळे यांना मोठी आघाडी मिळाली होती. तेव्हापासूनच युगेंद्र पवार यांचं नाव बारामती विधानसभेसाठी मोठ्या प्रमाणात चर्चेत आले होते.

# भरधाव टेम्पोची थांबलेल्या ट्रकला धडक; पंधरा वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू

**उरळी कांचन । प्रतिनिधी**

एका भरधाव टेम्पोने रस्त्याच्या कडेला थांबलेल्या ट्रकला पाठीमागून धडक दिल्याची घटना रविवारी (ता. ११) सकाळी सातच्या सुमारास उरळी कांचन हद्दीतील पुणे- सोलापूर महामार्गावर घडली. या अपघातामध्ये टेम्पो मधील अल्पवयीन मुलाचा जागीच मृत्यू झाला असून उरुळी कांचन पोलिसांनी टेम्पो चालकावर गुन्हा दाखल केला आहे.




बापुराव दत्तात्रय मोहोळकर (रा. बोरीपार्धी, धायगुडेवाडी, ता. दौड) असे पोलिसांनी अटक केलेल्या टेम्पो चालकाचे नाव आहे. तर वैभव भाउसाहेब माळी, (वय १५, रा. बोरमलनाथ मंदिराजवळ, केडगाव चैफुला, ता. दौंड) असे अपघातामध्ये मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. याप्रकरणी ट्रकचालक विनायक हनुमंत घोलप (वय २४, रा. सिंधी जवळगा, ता. जि. लातूर, सध्या रा. धायगुडेवाडी, बोरीपार्धी ता. दौंड) यांनी फिर्याद दिली आहे.

उरुळी कांचन पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत वैभव माळी हा आरोपी बापुराव मोहोळकर चालवत असलेल्या टेम्पोमधून प्रवास करत होता. मोहोळकर चालवत असलेला भरधाव टेम्पो सोलापूर - पुणे रस्त्यावरील उरुळी कांचन येथे आल्यानंतर चालकाचे टेम्पोवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे हा टेम्पो येथील कांचन स्वीट होमच्या जवळ उभ्या असलेल्या ट्रकला पाठीमागून जावून धडकला. या अपघातामध्ये प्रवासी वैभव माळी हा गंभीर जखमी झाला. त्याला ट्रकचालक विनायक घोलप व इतर नागरिकांनी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तो मयत झाल्याचे सांगितले. दरम्यान, मयत मुलाला ट्रकचालक घोलप व इतर नागरिक खासगी हॉस्पिटलमध्ये नेत असताना आरोपी बापूराव मोहोळकर मात्र, टेम्पो घेवून पळून गेला.

# विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात कार्यरत असणाऱ्या पोलिसाला मारहाण

विश्रांतवाडी - किरकोळ कारणावरून विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात कार्यरत असणार्या पोलिसाला मारहाण करण्यात आली.



या प्रकरणी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात कार्यरत असणार्या पोलीस नाईक धवल रविकांत लोणकर यांनी फिर्याद दिली आहे.

विजय सूर्यकांत केंजळे, (वय-२८ वर्ष), सूर्यकांत गणपतराव केंजळे (वय-५८ वर्षे), चंद्रकांत गणपतराव केंजळे (वय-५२ वर्ष), विशाल चंद्रकांत केंजळे (वय-२४ वर्ष), निमेश किशोर जगताप (वय-२१ वर्ष, सर्व रा. गुडविल संस्कृती, भैरवनगर, धानोरी, पुणे) हे रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास त्यांची पत्नी व मुलांसोबत त्यांच्या चारचाकी वाहनाने घरी जात असताना धानोरीमधील लेन नं.१०, भैरवनगर येथे त्यांच्या वाहनासमोर अचानक एक इसम आल्याने त्यांनी त्यांची कार थांबवली.

त्या कारणावरून यातील आरोपींनी त्यांच्यासोबत भांडण करून हाताने, लाथाबुक्क्यांनी मारहाण, शिवीगाळ करून, तसेच विजय सूर्यकांत केंजळे याने कोणत्यातरी हत्याराने फिर्यादी यांच्या नाकावर व ओठावर मारून जखमी केले. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस उपनिरीक्षक पद्मराज गंपले हे अधिक तपास करीत आहेत.

# राज्य सरकारकडून पुण्यातील गोखले इन्स्टीट्युटची लीड नॉलेज इन्स्टीट्युट म्हणून नेमणूक

**पुणे । प्रतिनिधी**

नजीकच्या भविष्यात राज्याच्या विकासात्मक वाटचालीच्या दृष्टीने आवश्यक धोरणात्मक सल्ले आणि संशोधन प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने पुण्यातील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेची महाराष्ट्र इन्स्टीट्युट फॉर ट्रान्सफॉरमेशन (मित्रा)च्या वतीने लीड नॉलेज इंस्टीट्युट म्हणून आज नेमणूक करण्यात आली. नीती आयोगाच्या धर्तीवर स्थापन करण्यात आलेली महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉरमेशन (मित्रा) ही अशा प्रकारची देशातील पहिलीच संस्था आहे. आज मुंबई येथे 'मित्रा' या संस्थेच्या नियामक मंडळाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीदरम्यान महाराष्ट्र इन्स्टीट्युट फॉर ट्रान्सफॉरमेशन (मित्रा) आणि गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेमध्ये एक सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेचे कुलगुरू डॉ अजित रानडे आणि 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी उपस्थित होते.




याबद्दल अधिक माहिती देताना गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेचे कुलगुरू डॉ अजित रानडे म्हणाले, मित्रा या संस्थेकडून लीड नॉलेज इंस्टीट्युट म्हणून गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेची झालेली नेमणूक ही आमच्या दृष्टिने अत्यंत अभिमानाची बाब आहे. नजीकच्या भविष्यात राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन अमेरिकी डॉलरपर्यंत नेण्याच्या दृष्टीने सरकारी धोरण तयार करणे आणि विकास धोरणे वाढवणे यासाठी योगदान देण्यावर आमचा भर असेल. तसेच मुख्यमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार समितीने पुढील ४-५ वर्षांत राज्याचा जीडीपी दुप्पट करण्यासंदर्भात सुचविलेल्या रोडमॅपची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या क्षेत्रांत अगदी सूक्ष्म स्तरावर काम केले जाईल.

यामध्ये गोखले इन्स्टिट्यूट एक लीड नॉलेज इन्स्टिटयूट म्हणून (झींपश) कार्यरत असेल. यासोबतच आयआयटी मुंबई, मुंबई विद्यापीठ, आयआयएम नागपूर या संस्थांचा सहभाग देखील या प्रकल्पामध्ये असेल. 'मित्रा'च्या उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी गोखले इन्स्टिट्यूट अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरणे यांमध्ये आपले योगदान देईल. या सामंजस्य करारांतर्गत गोखले इंस्टीट्युटला आवश्यक सर्व मदत ही 'मित्रा'कडून करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने संशोधकांची नेमणूक, संशोधनासाठीचे आर्थिक पाठबळ, पायाभूत सोयीसुविधा आदींचा समावेश आहे. या प्रक्रियेत गोखले इन्स्टिट्यूट ही संस्था 'इंटलेक्च्युअल थिंक टँक' म्हणून काम करेल अशी माहिती डॉ. अजित रानडे यांनी दिली.

# पूजा खेडकरांना २१ ऑगस्टपर्यंत दिलासा

**पुणे । प्रतिनिधी**

माजी प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना २१ ऑगस्टपर्यंत अटक करु नये, असे निर्देश दिल्ली उच्च न्यायालयाने दिल्ली पोलिसांना दिले. केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे केलेल्या अर्जात चुकीची आणि खोटी माहिती दिल्याचा आरोप पूजा खेडकर यांच्यावर आहे. पूजा खेडकर यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर दि. १२ दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली. दिल्लीतील पटियाला हाऊस न्यायालयाने खेडकरला जामीन देण्यास नकार दिला होता. या निर्णयाविरोधात खेडकरने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली होती.



न्यायमूर्ती सुब्रमण्यम प्रसाद यांच्या खंडपीठासमोर सोमवारी या प्रकरणी सुनावणी झाली. खेडकर यांची बाजू ज्येष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा, तर नरेश कौशिक यांनी यूपीएससीच्या वतीने युक्तीवाद केला. या युक्तीवादानंतर न्यायमूर्ती सुब्रमोनियम प्रसाद म्हणाले, आत्तापर्यंत मला तिच्या तात्काळ कोठडीची आवश्यकता आहे असे वाटत नाही.न्यायालयाने खेडकर यांना सध्या सुरू असलेल्या तपासात सहकार्य करण्याचे आदेश दिले. या प्रकरणात यूपीएससीला पक्षकार बनवून, तिने तिच्या अंतरिम जामीन अर्जावर आयोग आणि दिल्ली पोलिसांना नोटिसा बजावल्या आहेत. दरम्यान, पूजा खेडकरला युपीएससी फसवणूक प्रकरणी १ ऑगस्ट रोजी पटियाला हाऊस न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारला होता. त्यानंतर तिने या निर्णयाला आव्हान देणारी याचिका ८ ऑगस्ट रोजी दिल्ली उच्च न्यायालयात दाखल केली होती.

# आठ दिवस गुंगारा देणारा बिबट्या अखेर जेरबंद

आंबेगाव । प्रतिनिधी

आठ दिवस वनविभागाच्या पिंजाऱ्याला गुंगारा देणारा बिबट्या अखेर सोमवारी पहाटे पिंजऱ्यात अडकला, वळती (ता.आंबेगाव) येथील बिघे मळ्यात वनविभागाने आठ दिवसापूर्वी लावलेल्या पिंजऱ्यात अखेर बिबटचा पकडण्यात वनविभागाला यश आले असले तरी या भागात अजून दोन ते तीन बिबट्याचा वावर असल्याने पुन्हा या परिसरात पिंजरा लावण्यात येणार आहे.



वळती येथील बिघेवस्ती शिवारातील मारुती कारभारी भोर यांच्या शेतात वनविभागाने बिबट्याला पकडण्यासाठी गेल्या आठ दिवसांपूर्वी पिंजरा लावला होता. परंतु लावण्यात आलेल्या पिंजऱ्याला तो हुलकावणी देत होता, अखेरीस सोमवारी पहाटेच्या सुमारास हा बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याचे मारुती भोर, भाऊसाहेब जुंद्रे यांनी पाहिल्यानंतर त्यांनी तातडीने वन विभागाशी संपर्क केला, वनपरिक्षेत्र अधिकारी स्मिता राजहंस यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि रेस्क्यू टीम मेंबर यांनी पिंजऱ्यात अडकलेल्या बिबट्याला ताब्यात घेतले. याप्रसंगी स्थानिक नागरिकांनी गर्दी केली. पकडलेला बिबट्या हा चार वर्षाचा नर असून तो जास्त आक्रमक दिसून येत होता. पिंजऱ्यात अडकल्यानंतर त्याने पिंजऱ्याला वारंवार धडक्या दिल्या त्यानंतर बिबट्याला रेस्क्यु करून माणिकडोह येथील बिबट निवारण केंद्रात दाखल करण्यासाठी रवाना करण्यात आले.

बिबट्या जेरबंद झाल्याने स्थानिक नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास टाकला असला तरी या परिसरात दोन ते तीन बिबटे असल्याने वनविभागाने इतर बिबट्यांचाही बंदोबस्त करण्याची मागणी धोंडिभाऊ भोर, मारुती भोर, भाऊसाहेब जुंद्रे, बाळासाहेब लोखडे, वसंत लोखडे यांनी केली आहे. शेतकरी मारुती भोर यांच्या ओटच्यावर बसलेल्या पाळीव कुत्र्याला दिवसा ढवळ्या बिबट्याने उचलून नेण्याची घटना आठ दिवसापूर्वी घडली होती, तसेच एका धनगराची मेंढी देखील ठार केली होती आणि नागरिकांना रोज बिबट्याचे दर्शन होत असल्यानंतर वनविभागाने पिंजरा लावला होता या पिंजऱ्यात बिबटचा जेरबंद झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# शुक्रवारी 'या' परिसरात पाणीपुरवठा बंद राहणार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणेकरांसाठी महत्वाची बातमी आहे. गुरुवारी पुण्यातील स्वारगेट परिसरातील पाणीपुरवठा बंद असणार आहे. जलवाहिनीतून होत असलेली गळती थांबवण्याचे काम करण्यासाठी येत्या शुक्रवारी करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरातील काही भागाचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. शनिवारी सकाळी उशिरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. त्यामुळे पुणेकरांना गुरूवारी पाणी साठवून ठेवावं लागणार आहे.



ससून रुग्णालय परिसरातील पाण्याची मुख्य जलवाहिनी फुटली आहे. त्यामुळे सदर भागात मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत असल्या कारणाने महापालिका प्रशासनाकडून पाणी गळती थांबविण्यासाठी जलवाहिनी दुरुस्तीचे काम केले जाणार आहे. जलवाहिनी दुरुस्तीच्या कामामुळे शहराच्या मध्यवर्ती भागातील काही पेठांसह शुक्रवारी (ता.१६) पाणी पुरवठा बंद राहणार असल्याची माहिती आहे. दुसऱ्या दिवशी (शनिवारी) सकाळी उशिरा व कमी दाबाने पाणी पुरवठा होणार असल्याची माहिती महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने दिली आहे. पुणे महानगरपालिका भागातील रहिवाशांना त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी पुरेसे पाणी साठवून ठेवण्याचा सल्ला दिला आहे. पाणी कपातीच्या कालावधीत पुणेकर नागरिकांची गैरसोय होणार आहे. पाणी काटकसरीने वापरण्याचे आवाहन केले आहे. दुरुस्तीच्या कालावधीत पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने दुसऱ्या दिवशी कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी एक दिवस पुरेल एवढा पाणीसाठा करून ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कोणत्या भागात पाणीपुरवठा बंद राहणार?

पुणे स्टेशन परिसर, सोमवार पेठ, मंगळवार पेठ, गारपीर वस्ती, पांढरा गणपती परिसर, सोमवार पेठ पोलीस लाईन, बरके आळी, सारस्वत कॉलनी, घोडमाळा परिसर, जेथे पार्क, सगून हॉस्पिटल परिसर, गणेश खिंड रस्त्यावरील संचेती हॉस्पिटल ते मोदी बागपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूचा परिसर, जुना पुणे मुंबई रस्ता, संगम पूल ते मुळा रोड पर्यंत रस्त्याचा दोन्ही बाजूचा परिसर, ताडीवाला रोड झोपडपट्टी व जुना बाजार परिसराचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

# विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

पुणे : राहत्या घरात स्कार्पच्या सहायाने गळफास घेऊन विवाहितेने आत्महत्या केली. पती फोनवर बोलत असताना पत्नीने हे पाऊल उचलले. ही घटना रविवारी (दि. ११) सायंकाळी दत्तवाडी, आकुर्डी येथे घडली. अंकिता सौरभ राणे (वय ३४, रा. दत्तवाडी, आकुर्डी) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंकिता यांचे सासू सासरे हे पुण्यामध्ये गेले होते. त्यावेळी अंकिता व सौरभ हे पती पत्नी दोघेजण घरी होते. सौरभ हे फोनवर बोलत असताना अंकिता यांनी बेडरूममध्ये जाऊन छताच्या पंख्याला स्कार्पच्या सहायाने गळफास घेतला. ही बाब सौरभ यांच्या लक्षात येताच त्यांनी दरवाजा तोडून बेशुद्ध अवस्थेत असलेल्या अंकिता यांना जवळच्या दोन खासगी रुग्णालयात नेले. मात्र त्यांनी दाखल करून घेण्यास नकार दिला. त्यानंतर अंकिता यांना पिंपरीतील वायसीएम रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. निगडी पोलीस तपास करीत आहेत.

# डीएसके अॅण्ड असोसिएट्सला ग्राहक आयोगाचा दणका; मुदत ठेवीचे २ लाख रुपये व्याजासह देण्याचा आदेश

पुणे - मुदत ठेवीची रक्कम योग्य वेळेत न दिल्याने पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने डीएसके दांपत्य, डीएसके अॅण्ड असोसिएट्सला आणखी एक दणका दिला आहे. तक्रारदारांना २ लाख रुपये ५ मार्च २०२० पासून वार्षिक ५ टक्के व्याजाने देण्याचा आदेश दिला आहे.



याबरोबरच मानसिक त्रासापोटी १०, तक्रारीच्या खर्चापोटी ७ हजार रुपये द्यावेत. निकालाची प्रत मिळाल्यासून ४५ दिवसाच्या आत या आदेशाची पूर्तता करावी. अन्यथा वार्षिक ७ टक्के व्याज द्यावे लागेल, असेही आदेशात म्हटले आहे. असेही आयोगाचे अध्यक्ष अनिल जवळेकर, सदस्या सरीता पाटील यांनी आदेशात म्हटले आहे. याबाबत मृदुला श्रीकांत साठे आणि श्रीकांत रघुनाथ साठे (रा. कोथरूड) यांनी अॅड. ज्ञानराज संत यांच्यामार्फत ग्राहक तक्रार निवारण आयोगात तक्रार दाखल केली होती. १६ मार्च २०२१ रोजी ही तक्रार दाखल करण्यात आली होती. तक्रारदारांनी कष्टाच्या कमाईतील १ लाख रुपये ४ एप्रिल २०१५ रोजी डीएसके अॅण्ड असोसिएट्मध्ये मुदत ठेव म्हणून ५९ महिन्यांसाठी गुंतवले. या गुंतवणुकीवर १४.१९ टक्के त्रिमासिक चक्रवाढ व्याज देण्याचे कबूल केले. ठेव ३ मार्च २०२० रोजी परिपक्व झाली. ४ मार्च २०२० रोजी कंपनीने तक्रारदारांना १ लाखाचा धनादेश दिला. मात्र, हा धनादेश वटला नाही. रक्कम परत मिळावी म्हणून तक्रारदारांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. ६ जून २०२० रोजी कंपनीला पत्र लिहून गुंतवणूकीची रक्कम परत करण्याची विनंती केली. मात्र, कंपनीने गुंतवलेली रक्कम आणि त्यावरचे व्याज परत न केल्याने तक्रारदारांनी ग्राहक आयोगात धाव घेत तक्रार दाखल केली. कंपनीमध्ये गुंतवलेली रक्कम व्याजासहीत परत मिळावी, मानसिक त्रासापोटी १ लाख, तक्रारीच्या खर्चापोटी ५० हजार रुपये मिळावे, अशी मागणी केली. या प्रकरणी कंपनीने लेखी म्हणणे दाखल केले. डीएसके दांपत्य १७ फेब्रुवारी २०२० पासून न्यायलयीन कोठडीत आहे. शिवाय कंपनीची कागदपत्रे २०१८ पासून पोलिसांच्या ताब्यात आहेत. बँक स्टेटमेंट, बुक अकाउंट पाहिल्या शिवाय तक्रार योग्य आहे की नाही? हे सांगता येणार नाही. त्यामुळे कंपनी विरुद्ध कोणताही आदेश पारित न करण्याची विनंती केली. आयोगाने दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेत आयोगाने निकाल दिला.

# विभागीय लोकशाही दिनात पाच प्रकरणांवर सुनावणी

**पुणे । प्रतिनिधी**

प्रशासनाने नागरिकांच्या तक्रारींची त्वरित दखल घेऊन त्या सोडवाव्यात आणि नागरिकांना लोकशाही दिनामध्ये त्यांची तक्रार दाखल करावी लागणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.




विभागीय आयुक्त कार्यालय सभागृहात विभागीय स्तरावरील लोकशाही दिनातील प्रकरणांच्या सुनावणीदरम्यान ते बोलत होते. उपायुक्त (सामान्य प्रशासन) वर्षा लड्डा ऊंटवाल, सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे विभाग मुख्य अभियंता संदिप खलाटे, सहसंचालक उच्च शिक्षण मयुरेश जोशी यावेळी उपस्थित होते. जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तक्रार निवारण न झालेल्या पाच प्रकरणांवर यावेळी डॉ.पुलकुंडवार यांनी अर्जदारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली आणि सुनावणी घेतली. अर्जदारांच्या तक्रारींचे निवारण तातडीने (झींपश) करण्याच्या सूचना संबधित अधिकाऱ्यांना केल्या. तसे न केल्यास अधिकाऱ्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरुन कारवाई करण्याचे आणि पुढील सुनावणीमध्ये समक्ष उपस्थित राहण्याचे आदेशित करण्यात येईल असे यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी विविध विभागांचे विभागस्तरीय अधिकारी उपस्थित होते.